महाराष्ट्र विधानसभा
तिसरे अधिवेशन, २०२५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी
प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मुंबई उपनगरातील तसेच ठाणे, नवी मुंबई, वसई-विरार परिसरातील कामगारांना रोजगार मिळणेबाबत

(१) ७३ (०९-०४-२०२५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.महेश सावंत (माहिम) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील तसेच ठाणे, नवी मुंबई, वसई-विरार परिसरातील शेकडो नाक्यांवर लाखो कामगार कामाच्या प्रतिक्षेत असून त्यांना रोजगार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकाम कामगारांना वेतन, पाल्यांना शिक्षणाची, आरोग्याची सुविधा मिळणेबाबत तसेच रोजगार हमी, कल्याणकारी योजनांची मागणी कामगार संघटनांनी माहे, डिसेंबर, २०२४ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर कामगारांना घरकुल योजनेचा लाभ मिळणे व त्यांच्या पाल्यांना शिक्षण, आरोग्य सुविधा तातडीने मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर (११-११-२०२५) : (१) हे खरे नाही. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात येऊन त्यांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात येतो.

(२) हे अंशत: खरे आहे. माहे,डिसेंबर २०२४ मध्ये कामगार संघटनांकडून निवेदने प्राप्त झाली आहेत. सदर निवेदनाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये बांधकाम कामगारांच्या पाल्यांना शिक्षण, आरोग्य सुविधा, रोजगार हमी व कल्याणकारी योजना राबविण्यात यावी, अशी मागणी केली असल्याचे दिसून येत नाही.

तथापि, मंडळामार्फत बांधकाम कामगार व त्यांच्या पाल्यांकरिता इयत्ता पहिली ते पदव्युत्तर पदवीपर्यंतच्या तसेच, वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षणाकरिता अर्थसहाय्य वितरीत करण्यात येते. तसेच विविध आर्थिक सहाय्य व सामाजिक सुरक्षेच्या योजनांचा लाभ देण्यात येतो. याशिवाय बांधकाम कामगार त्याची १० वर्षापर्यंत २ अपत्ये यथास्थिती आई / वडील / सासू / सासरे यांचेकरिता “तपासणी ते उपचार” आरोग्य योजना राबविण्यात येत असून त्यामध्ये आरोग्य तपासणी, प्रगत पृष्ठीकरण चाचणी प्रति लाभार्थी रु.५०००/- पर्यंतचा औषधोपचार, रुग्णालय भरती या बाबीचा समावेश आहे.

तसेच वयाची ६० वर्षे पूर्ण झालेल्या मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांना निवृत्तीवेतन लागू करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे मंडळामार्फत नोंदीत बांधकाम कामगारांना बार बेंडीग, दगडी बांधकाम, सुतारकाम,

प्लंबींग, रंगकाम मचाणकाम, इलेक्ट्रीशीयन आणि वेल्डींग या आठ ट्रेडचे निशुल्क प्रशिक्षण देण्याकरीता प्रशिक्षण संस्थाची निवड करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत सदर योजनेंतर्गत बांधकाम कामगारांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील गैरहजर प्राध्यापक डॉक्टरांना सेवेत रुजू करणेबाबत

(२) १०८ (२५-०४-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नव्याने सुरु होणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्राध्यापकांचा तुटवडा असताना मुंबई, नागपूर, यवतमाळ, औरंगाबाद, कोल्हापूर, धुळे, सोलापूर, मिरज, नांदेड येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील ४० प्राध्यापक गेली अनेक वर्षापासून गैरहजर असून काही प्राध्यापक डॉक्टर गेली १० ते २० वर्षापेक्षा अधिक काळ गैरहजर असल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राध्यापक गैरहजर असल्याने त्याचा परिणाम वैद्यकीय सेवा आणि शिक्षण या विभागावर होत असून दिर्घकालीन रजेच्या कालावधीमध्ये काहीजणांची सेवा समाप्ती झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त महाविद्यालयातील ४० प्राध्यापक गेली अनेक वर्षांपासून गैरहजर असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त गैरहजर असणाऱ्या प्राध्यापक डॉक्टरांना तात्काळ सेवेत रुजू करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (३१-१०-२०२५) : (१), (२) व (३) राज्यातील मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, यवतमाळ व कोल्हापूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील एकूण ९ अध्यापक हे दिर्घ कालावधीपासून अनधिकृतरित्या विनापरवानगी गैरहजर आहेत. या संस्थामधील संबंधित विषयातील उपलब्ध अध्यापकांच्या मदतीने कामकाज हाताळण्यात येत असल्याने त्याचा संस्थामधील कामकाजावर परिणाम झालेला नाही.
(४) व (५) राज्यातील सर्व संस्थामधील दीर्घ कालावधीपासून कर्तव्यावर अनधिकृतपणे / विनापरवानगी गैरहजर असणाऱ्या अध्यापकांना शेवटची संधी म्हणून कर्तव्यावर हजर होण्यासाठी दि.१९.०६.२०२३ व दि.१०.०७.२०२३ रोजी वृत्तपत्रात जाहीर नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुसार रुजू न झालेल्या अध्यापकांच्या सेवा समाप्त करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील आशा सेविका व गटप्रर्वतक यांच्या मागण्यापूर्ण करणेबाबत

(३) ३५७ (१७-०४-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ७० हजार पेक्षा अधिक आशा सेविका व ३५०० पेक्षा अधिक गटप्रवर्तक या आरोग्य सेवासह शासकीय योजनांची अंमलबजावणी करण्याचे काम करीत असून त्यांना शासन नियमाप्रमाणे “कामावर आधारित मोबदला” दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांना मिळणारे मानधन अतिशय तटपुंजे असल्याने त्यात प्राथमिक गरजाही पूर्ण होत नाही तसेच त्यांना दिवाळी पूर्वी बोनसही दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अत्यल्प शैक्षणिक पात्रता असणाऱ्या महिलांना आशा सेविका किंवा गटप्रवर्तक म्हणून नियुक्ती देण्यात आली असून बहुतांशी इंग्रजी भाषेत असलेल्या आरोग्य विभागाच्या विविध ॲपवर ऑनलाइन माहिती भरण्याची सक्ती त्यांना केली जाते तसेच त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा अद्याप देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन आशा सेविका व गटप्रर्वतक यांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर (०७-१०-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) आशांना केंद्र शासनाचे ४ बाबींवर काम केल्यास रू. २०००/-, एचडब्लुसी टिम बेस इन्सेटिव्ह रु. १०००/- असे केंद्र शासनाचे दर महिन्याला रु.३०००/- निधी अदा करण्यात येतो. तसेच राज्य शासनाकडून आशांना रु. १००००/- मानधन अदा करण्यात येते. आशांना केंद्र व राज्य शासन एकत्रित मानधन रू.१३०००/- मासिक अदा करण्यात येते. तसेच या व्यतिरिक्त इतर बाबीवरील कामावर आधारित मोबदला आशांना अदा करण्यात येत असून साधारण रु.१५०००/- ते रु.१७०००/- पर्यंत मासिक कामावर आधारीत मोबदला आशांना अदा करण्यात येत आहे. गटप्रवर्तक हे क्षेत्रीय भेटी या तत्वावर नियुक्त करण्यात येतात, केंद्रशासनाचे रु. ८७७५/- राज्य शासनाचे रु.११२००/- असे एकत्रित रु. १९९७५/- मासिक मानधन अदा करण्यात येत आहे.

आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना दिवाळी बोनस लागू नाही.

(३) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार आशा स्वयंसेविकांच्या माध्यमातून आयुष्यमान कार्ड तयार करणे, आभा कार्ड तयार करणे, एनसीडी पोर्टल मध्ये सी बँक फॉर्म भरणे, यु विन पोर्टलमध्ये माहिती भरणे ही ऑनलाईन कामे करण्यात येत आहेत. आशा स्वयंसेविकांच्या माध्यमातून सदर ऑनलाईन कामे करण्यासाठी मराठी भाषेत ॲप्लीकेशन उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक या कामावर आधारित मोबदला या तत्त्वावर नियुक्त करण्यात येत असल्याने शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देणे शक्य नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

नागपूर येथे औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सुविधा उभारणेबाबत

(४) ४२५ (२८-०४-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील हिंगणा, बुटीबोरी, विस्तारीत बुटीबोरी, अतिरिक्त बुटीबोरी या चारही औदयागिक क्षेत्राकडे देशातील आघाडीच्या मोठया उत्पादक कंपन्यानी पाठ फिरवली असल्याचे निदर्शनास आले असून बुटीबोरी व हिंगणा एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रातील अनुक्रमे ३५० व ३७५ कंपन्या बंद झाल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात एमआयडीसी कडे पाठपुरावा करुनही प्रशासन लक्ष देत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे एमआयडीसी ने करवसुलीतून या क्षेत्रात अदयावत पायाभूत सुविधा उभाराव्यात अशी येथील उद्योजकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बुटीबोरी औद्योगिक वसाहतीत विविध समस्या मुंबईसह स्थानिक स्तरावर कार्यकारी अधिकाऱ्यांची नियुक्ती करुन सोडवाव्यात, बंद कारखान्यांवर तातडीने निर्णय घेणे तसेच एमआयडीसीची ३० टक्के जमीन कामहीन असणे, कारखाने बंद असणे,कामगारांना परवडणारी घरे उपलब्ध नसणे, विशिष्ट वेळेत बीसीसी पूर्ण न केलेल्या उद्योजकांवर दंड आकारणे, अवैध अतिक्रमण हटविण्याकरिता अतिक्रमण विरोधी मोहीम राबविणे,एमआयडीसी संबंधित फाईलची मंजुरी जलद करण्यासाठी वरिष्ठ अधिकारी संयुक्त सीईओची प्रत्येक आठवडयात दोन दिवस नागपूर येथे अनिवार्यपणे नियुक्ती करणे या व इतर प्रलंबित मागण्याबाबत त्वरीत निर्णय घेण्याबाबतच्या मागण्या बुटीबोरी मॅन्युफॅक्चरर्स असोशिएशनच्या शिष्टमंडळाने एमआयडीसीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे माहे जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बंद होणाऱ्या उद्योगामुळे नागपूरसह विदर्भात बेरोजगारीचे प्रमाण वाढत असल्याने विदर्भात उद्योगाला चालना देण्यासह येथील औदयागिक क्षेत्रात अदयावत पायाभूत सुविधा उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (०५-०९-२०२५) : (१) नागपूर येथील हिंगणा, बुटीबोरी, विस्तारीत बुटीबोरी, अतिरिक्त बुटीबोरी या चारही औद्योगिक क्षेत्रात उद्योग कंपन्यांनीपाठ फिरवली नसून सद्यःस्थितीत चारही क्षेत्रात वाटप केलेल्या एकूण भूखंड ४१४६ पैकी २८४५ भूखंडावर उत्पादन सुरु आहे.

विस्तारीत बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रात मे. मदर डेअरी व मे. होरीबा इंडीया प्रा.लि. या सारखे विशाल प्रकल्प आले असून अतिरिक्त बुटीबोरी मध्ये मे. गोयल प्रोटीन, मे. बैद्यनाथ बायोफ्युअल प्रा.लि., मे. एल. जी. बालक्रिश्नन ॲड ब्रोस लि. इ. प्रकल्प कार्यरत आहेत.

तसेच नव्याने येणाऱ्या मे.परनॉड रिकार्ड इंडिया प्रा.लि., मे.अवादा इलेक्ट्रो प्रा.लि., मे.जेएसडब्ल्यू एनर्जी पीएसपी इलेवन लि., मे.जेएसडब्ल्यू रिनिवेबल टैक्नोलॉजी प्रा.लि., मे.संगम सोलार वन प्रा.लि., मे.वर्धान लिथियम इंडिया प्रा.लि. व मे.हाऊसुंग कॉर्पो.इंडिया प्रा.लि अशा एकूण ७ विशाल प्रकल्पांमध्ये रू.१.०७ लक्ष कोटी गुंतवणुक येत असून जवळपास ३०,००० रोजगार उपलब्ध होणार आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

हिंगणा, बुटीबोरी, अतिरिक्त बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रामध्ये डांबरी रस्ते, जलवाहिन्या, जलवितरिका, पाणीपुरवठा योजना, पथदिवे, सामाईक सुविधा केंद्र, अग्निशमन केंद्र, इ. मुलभूत पायाभूत सेवा सुविधा

महामंडळाकडुन यापूर्वीच पुरविण्यात आलेल्या आहेत. तसेच बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रामध्ये वाहनतळ, सामायीक घातक घनकचरा प्रक्रीया, साठवणूक व विल्हेवाट सुविधा (CHWTSDF) म.औ.वि. महामंडळाकडुन पुरविण्यात आलेल्या आहेत.

(४) व (५) बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रात १४५४ उद्योग घटक उत्पादनात असून, १९० बंद स्थितीत असलेल्या उद्योग घटकावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांच्या कारखान्यात काम करीत असलेल्या कामगारांना निवासाची व्यवस्था करणेचे अनुषंगाने, म.औ.वि. महामंडळामार्फत ई-निविदेद्वारे (Maha Tender Allotement) निवासी भूखंड वाटप करण्याचे धोरण राबविण्यात येत आहे. विहीत कालावधी बीसीसी पुर्ण न केलेल्या उद्योगजकांकडून म.औ.वि. महामंडळाच्या नियमानुसार मुदतवाढीकरीता ना परतिची अतिरिक्त रक्कम वसुल करण्यात येते. तसेच अवैध अतिक्रमण हटविण्याकरीता अभियांत्रिकी विभाग (SPA) यांचेकडून मोहिम राबविण्यात येते.

उद्योजकांचे प्रस्तावावर जलदगतीने कार्यवाही करण्यासाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (४) म.औ.वि. महामंडळ, मुंबई आठवडयातुन एक दिवस नागपूर येथे उपस्थित राहत असतात.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील एमआईडीसी मधील कंपन्या स्थलांतरीत करणेबाबत

(५) ४६७ (१७-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील एमआयडीसी मधील ४०० कंपन्यांपैकी २३४ कंपन्या धोकादायक असल्याने सदर कंपन्या इतरत्र स्थलांतरीत करण्याची शिफारस शासनाने स्थापन केलेल्या समितीने केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीच्या शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर धोकायदायक कंपन्या स्थलांतरीत करतांना तेथील हजारो कामगार बेरोजगार होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार औद्योगिक सुरक्षा व उद्योगांच्या जमिनी उद्योगांनाच देऊन कामगारांना दिलासा देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (१४-०७-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) कृती आराखडा समितीच्या दि.३१.०५.२०२४ रोजीच्या पहिल्या बैठकीत दिलेल्या निर्देयांच्या अनुषंगाने सर्वेक्षण करण्याकरीता व वर्गीकरण करण्याकरीता सह मु. का. अ. मऔविम यांच्या नियंत्रणाखाली क्षेत्रीय सर्वेक्षण समिती गठित करण्यात आली.

कृती आराखडा समितीने घेतलेल्या बैठकांमध्ये वेळोवेळी दिलेल्या आदेशाप्रमाणे क्षेत्रीय सर्वेक्षण समितीने सर्वेक्षणाचे काम संयुक्तपणे औद्योगिक क्षेत्रातील रहिवासी क्षेत्रापासून ५० मी. अंतरापर्यंत, १०० मी. अंतरापर्यंत व १०० मी. अंतरापुढे असलेल्या उद्योगांचे सविस्तर सर्वेक्षण प्रत्यक्ष जागेवर जाऊन पूर्ण केले आहे. सदर सर्वेक्षणादरम्यान धोकादायक व अतिधोकादायक इत्यादी अशी उद्योगांची वर्गवारी करून पूर्ण करण्यात आली आहे.

(३) व (४) भविष्यात अशा घटना टाळण्याच्या दृष्टीकोनातून म.औ.वि. महामंडळाच्या डोंबिवली औद्योगिक क्षेत्रामधील फक्त धोकादायक, अति-धोकादायक उद्योग व रासायनिक उत्पादन प्रक्रिया उद्योग स्थलांतरीत करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

आयुष्यमान भारत योजनेंतर्गत आरोग्य विमा सुविधा देण्याबाबत

(६) ६६१ (२८-०४-२०२५). श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "आयुष्यमान भारत" योजनेअंतर्गत ७० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या सर्व ज्येष्ठ नागरिकांना कोणत्याही उत्पन्न मर्यादेशिवाय आरोग्य विमा सुविधा देण्यास माहे सप्टेंबर, २०२४ रोजीच्या सुमारास केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यानुसार राज्य शासनाने राज्यातील किती वृध्दांना लाभ दिला आहे ,

(३) असल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. प्रकाश आबिटकर (१७-१०-२०२५) : (१) होय, खरे आहे.

(२) दि.१ एप्रिल २०२५ पासून राज्यात सदर योजनेची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यानुसार दि.६.५.२०२५ पर्यंत ६,२६३ लाभार्थ्यांनी ८,४०७ उपचारांसाठी योजनेचा लाभ घेतला आहे.

(३) राज्यामध्ये, दिनांक १.७.२०२५ पर्यंत ३,०८,३०२ जेष्ठ नागरीकांचे आयुष्मान वय वंदना कार्ड निर्माण करण्यात आलेले आहेत. आयुष्मान वय वंदना कार्ड निर्माण करण्यात काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास अशा लाभार्थ्यांना त्यांचेकडे असलेल्या शिधापत्रिकेच्या आधारे राज्य शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमधून मोफत उपचार देण्यात येतात.

माथेरान (जि.रायगड) येथील आदिवासी वाड्यातील ग्रामस्थांना रस्ता उपलब्ध करुन देणेबाबत

(७) १२३२ (२६-०४-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (जि.रायगड) येथील डोंगरालगत वसलेल्या १२ आदिवासी वाड्यातील ग्रामस्थांना डांबरी रस्ता नसल्याने या भागातील आदिवासी नागरिकांना खाचखळग्यातून प्रवास करावा लागल्याने आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी वाड्यांना मुख्यमंत्री सडक योजनेतून मंजूर असलेली कामे तात्काळ सुरु करुन येथील नागरिकांना सुलभ रस्ता उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१५-०९-२०२५) : (१), (२) व (३) मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा २ अंतर्गत एकूण १३.५ किमी लांबीच्या रामा ७६ ते जुमपट्टी रस्ता ता.कर्जत (पॅकेज क्रमांक ADB-RAI (II)-०२) या कामास

दि.०८.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामास दिनांक २७/०४/२०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

सदर रस्त्याच्या मार्गीकेमधील ९०% लांबी वन विभागाच्या अखत्यारीत असणाऱ्या जागेतून जात असल्याने सदर जागेत काम करणेसाठी वनविभागाची परवानगी घेणे साठी प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्या विभागाच्या मंजूरीनंतर रस्त्यांचे काम सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मिहान, नागपूर येथील अखिल भारतीय आयुविज्ञान संस्थेला (एम्स) जागा उपलब्ध करुन देणेबाबत

(८) १४९६ (२८-०४-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिहान, नागपूर येथील अखिल भारतीय आयुविज्ञान संस्थेला (एम्स) आणखी ५० एकर जागेची आवश्यकता निर्माण झाली असून सदर जागा महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलमेंट कंपनीने (MADC) देण्याची तयारी दिनांक २९ जुलै, २०२४ रोजी वा त्यादरम्यान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना पत्राद्वारे कळविले असूनही अद्याप जमीनीचा ताबा दिला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार जमीनीचा ताबा सदरच्या रुग्णालयास देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१८-०८-२०२५) : (१) हे खरे नाही

(२) मिहान, नागपूर परिसरातील AIIMS, नागपूर लगतची ६ एकर तसेच सेक्टर-१९ मधील ५० एकर जमीन Non SEZ क्षेत्रात आणि सदर भूखंडाला लागून उपलब्ध नाही, असे अभिप्राय महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांनी दिल्याचे सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १२.७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

गोंदिया जिल्हयातील अनेक कुटुंबियांवर आलेल्या अडचणीबाबत

(९) १५५२ (२८-०४-२०२५). श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देश स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना ७५ वर्षांचा कालखंड लोटल्यानंतरही सर्वसामान्य व दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना विकासाच्या मुख्य प्रवाहात न घेतल्याने तसेच आर्थिक विंवचनेमुळे जीवन जगत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोंदिया जिल्हयात शासकीय नोंदणीनुसार वर्षाला १० हजाराहून अधिक जणांचा विविध कारणाने मृत्यु होत असून उक्त जिल्हयात दरदिवशी २० जणांचे मृत्यू होत असून बहुतांश कुटुंबांची अंतिम संस्कार करण्यासाठी देखील आर्थिक परिस्थिती नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कुटुंबांकडे सोपस्कारासाठी अद्याप कुठलीही पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे अनेक कुटुंबियांना कर्जबाजारी व्हावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. जयकुमार गोरे (२४-०९-२०२५) :(१) हे खरे नाही. गोंदिया जिल्ह्यातील क्षेत्रात अशा प्रकारची घटना निदर्शनास आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील नगर पंचायत क्षेत्रात एमआयडीसी उभारणेबाबत

(१०) १६३१ (०५-०५-२०२५). श्री.प्राविण विरभद्रया स्वामी (सर) (उमरगा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जवळपास १५० नगर पंचायत क्षेत्रात एमआयडीसी उभारणीचा निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने आजपर्यंत किती नगर पंचायत क्षेत्रात एमआयडीसी मंजूर करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, त्यासाठी पर्याप्त निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

श्री. उदय सामंत (०५-०९-२०२५) : (१), (२), (३) व (४) राज्यातील जवळपास १५० नगर पंचायत क्षेत्रात एमआयडीसी उभारणीचा निर्णय घेण्यात आल्याचे आढळून येत नाही.

तथापि, म.औ.वि.महामंडळाची स्थापना झाल्यापासून खालील नगर पंचायत क्षेत्रांमध्ये म.औ.वि.महामंडळाची स्थापना करण्यात आल्याचे दिसून येते:-

अ.क्र.	प्रादेशिक कार्यालय	औद्योगिक क्षेत्र	नगरपंचायत
१.	सांगली	कवठेमहांकाळ	कवठेमहांकाळ
२.	सांगली	कोरेगांव	कोरेगांव
३.	सातारा	लोणंद	लोणंद
४.	छ. संभाजीनगर	जाफ्राबाद	जाफ्राबाद
५.	छ. संभाजीनगर	आष्टी	आष्टी
६.	छ. संभाजीनगर	पाटोदा	पाटोदा
७.	नाशिक	पेठ	पेठ
८.	अमरावती	तिवसा	तिवसा
९.	अमरावती	धारणी	धारणी
१०.	अमरावती	भातकुली	भातकुली
११.	अमरावती	नांदगांव-खंडेश्वर	नांदगांव-खंडेश्वर
१२.	अमरावती	मारेगांव	मारेगांव
१३.	अमरावती	महागांव	महागांव

हाफकिन संस्थेमध्ये कार्यरत कमचारी सेवानिवृत्ती लाभापासून वंचित असल्याबाबत

(११) १६४५ (२५-०४-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हाफकिन संस्थेमध्ये कार्यरत कर्मचारी सेवानिवृत्ती लाभापासून अद्यापही वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ सप्टेंबर, १९७५ साली मूळ हाफकिन संस्थेचे विभाजन होऊन दोन स्वायत्त संस्थेत विभाजन करण्यात आले असून शासनाने दिनांक १९ सप्टेंबर, १९७५ रोजीच्या शासकीय निर्णयाद्वारे मूळ हाफकिन संस्थेमधील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना शासकीय सेवक म्हणून मान्यता दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांची शासकीय सेवा १० वर्षांच्या पेक्षा कमी झाली असल्याने त्यांना या निर्णयाद्वारे शासनाचा शासन निर्णय असतांना देखील शासकीय सेवेपासून वंचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मध्यप्रदेशच्या हायकोर्टच्या निर्णयानुसार स्वायत्त संस्था निर्माण करताना जर सेवेमध्ये एक दिवसाचा ब्रेक दिला नसेल तर अशा कर्मचाऱ्यास सेवनिवृत्ती वेतन देणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त संस्थेमध्ये १९२ कर्मचारी, अधिकारी असून यापैकी ५० टक्के कर्मचारी, अधिकारी हयात नसून उर्वरित कर्मचारी हे सेवानिवृत्ती लाभापासून वंचित असून ते हालाखीचे जीवन जगत आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून हाफकिन संस्थेमध्ये कार्यरत कमर्चारी व अधिकाऱ्यांना सेवानिवृत्ती लाभापासून वंचित राहू नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०३-१०-२०२५) : (१),(२),(३), (४) व (५) वित्त विभाग, शासन निर्णय, दि.१७.१०.१९६७ आणि दि.२५.०४.१९७३ मधील निवृत्तीनंतरच्या लाभाविषयीचे प्रचलित धोरण स्वयंस्पष्ट आहे. सदर शासन निर्णयातील अटीनुसार भुतपूर्व हाफकिन संस्थेमध्ये ज्या कर्मचाऱ्यांची किमान १० वर्ष शासकीय सेवा पुर्ण केली आहे, असेच कर्मचारी निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र ठरतात. १० वर्षापेक्षा कमी सेवा असलेल्या कर्मचा-यांना उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदीनुसार निवृत्तीवेतन अनुज्ञेय नाही.

नगर विकास विभाग, शासन निर्णय, दि.३०.०४.१९७५ अन्वये तत्कालीन शासकीय हाफकिन संस्थेचे विभाजन हाफकिन संस्था व हाफकिन महामंडळ असे करण्यात आले. भूतपुर्व हाफकिन संस्थेमध्ये कार्यरत कर्मचा-यांना देण्यात आलेल्या विकल्पानुसार त्यांना संस्था/महामंडळ यात समाविष्ट करुन घेण्यात आले. भूतपुर्व हाफकिन संस्थेमधील सेवा व हाफकिन महामंडळ व हाफकिन संस्था यामधील सेवा एकत्रित गणना करुन कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवानिवृत्तीविषयक फायदे देण्याचे शासनाचे धोरण नाही.

भूतपूर्व हाफकिन संस्थेत ज्या कर्मचा-यांनी किमान १० वर्ष शासकीय सेवा पुर्ण केली आहे, असेच कर्मचारी निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र ठरत असल्याने त्यांना निवृत्तीवेतनाचे लाभ देण्यात आले आहेत.

भूतपुर्व हाफकिन संस्थेतील १९२ कर्मचा-यांच्या सेवा १० वर्षापेक्षा कमी कालावधीच्या असल्याने ते सेवानिवृत्तीवेतन लाभास पात्र नाहीत. तथापि, हाफकिन संस्थेतील कर्मचारी यांना सेवानिवृत्तीवेतन वगळता सेवा-नि-उपदान, शिल्लक अर्जित रजा रोखीकरण इत्यादी सेवानिवृत्तीविषयक लाभ देण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

एम.बी.बी.एस. च्या द्वितीय वर्षाच्या अंतिम परिक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याबाबत

(१२) १८४३ (२८-०४-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात घेण्यात आलेल्या एम.बी.बी.एस. च्या द्वितीय वर्षाच्या अंतिम परिक्षेच्या प्रश्नपत्रिका दिनांक २ ते ९ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान फुटली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असल्याने या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने यास जबाबदार असण्याऱ्या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१६-०९-२०२५) : (१) होय खरे आहे,

(२) व (३) दिनांक ०२.१२.२०२४ रोजीचा फार्माकॉलॉजी-१आणि दिनांक ०९.१२.२०२४ रोजीचा पॅथॉलॉजी-२ हे पेपर फुटल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, दिनांक ०४.१२.२०२४ रोजीचा फार्माकॉलॉजी - २ हा पेपर फुटलेला नसून, विद्यापीठामार्फत खबरदारीचा उपाय म्हणून, नवीन प्रश्नपत्रिका सर्व परीक्षा केंद्रांवर ई-मेलद्वारे पाठविण्यात येवून, त्याच दिवशी परीक्षा घेण्यात आली आहे. सदर प्रकरणी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झालेले नाही. तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत फार्माकॉलॉजी-१ व पॅथॉलॉजी-२ या विषयांच्या पेपर फुटींच्या अनुषंगाने अनुक्रमे दि.४.१२.२०२४ व दि.१०.१२.२०२४ रोजी म्हसरुळ पोलीस, ठाणे नाशिक येथे भारतीय न्यायसंहिता कलम ३१८ (४), ६२ सह महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विर्निदिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध अधिनियम, १९८२ च्या कलम ६ अन्वये गुन्हा नोंद करुन अनुक्रमे प्रथम खबर अहवाल (FIR) क्र.II/२९४ व क्र.I/३०१ दाखल करण्यात आले आहेत. तसेच याबाबत म्हसरुळ पोलीस स्टेशनमार्फत पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौ. खडकत (ता.आष्टी, जि.बीड) येथील बेकायदेशीर कत्तलखाने कायमस्वरूपी बंद करण्याबाबत

(१३) २०३० (१८-०४-२०२५). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.खडकत (ता.आष्टी, जि.बीड) येथील बेकायदेशीर कत्तलखाने कायमस्वरूपी बंद करण्याबाबत ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत दिनांक २३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान ठराव घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्याअुषंगाने उक्त बेकायदेशीर कत्तलखाने चालविणाऱ्यांविरूद्ध कारवाई करुन कत्तलखाने बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (०९-०९-२०२५) : (१) होय खरे आहे.
(२) सदर प्रकरणी मौजे.खडकत ता.आष्टी, जि.बीड येथील बेकायदेशीर कत्तलखाने कायमस्वरूपी बंद करणेबाबत महसूल विभागाकडून बेकायदेशीर पणे सुरु असलेले कत्तलखाने जागा धारकांना नोटीस बजाविण्यात आली होती, तदनंतर जागा मालकांचा खुलासा असमाधानकारक असल्यामुळे पाच कत्तलखाने JCB च्या सहाय्याने दि.०९/०३/२०२४ रोजी पाडण्यात आले व मा. न्यायालयाच्या आदेशान्वये उर्वरित ६ कत्तलखाने पैकी ४ दि ०४/०६/२०२४ व उर्वरित २ कत्तलखाने दि. १४/१०/२०२४ रोजी शासन निगराणी खाली घेण्यात आहे आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

गोंडपिपरी (जि.चंद्रपूर) तालुक्यात एमआयडीसी परिसरात उद्योग सुरु करणेबाबत

(१४) २२२९ (१७-०४-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंडपिपरी (जि.चंद्रपूर) या तालुक्याच्या ठिकाणी एमआयडीसीची स्थापना झाली असून सदर परिसर हे राष्ट्रीय महामार्ग ३५३ B ला लगत असूनही परिसरात अद्यापही एकही नवीन उद्योग आलेला आलेला नसल्याने येथे बेरोजगारी वाढली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन औद्योगिक धोरणामध्ये गोंडपिपरी तालुक्याचा समावेश करून येथे नवीन उद्योग सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (१६-०७-२०२५) : (१) व (२) गोंडपिंपरी औद्योगिक क्षेत्राची स्थापना सन-१९९० मध्ये करण्यात आलेली आहे. गोंडपिपरी औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याकरीता मौजे-करंजी, ता. गोंडपिंपरी येथे म.औ.वि. महामंडळाने १४.०१ हे.आर. जमीन संपादित केलेली आहे. त्याकरिता प्रकरण ६ ची अधिसूचना दि.२७/०९/१९९० रोजी प्रसिद्ध झालेली असून सदर जमिनीचा ताबा ३०/०५/१९९७ म.औ.वि. महामंडळास प्राप्त झाला आहे.

गोंडपिंपरी औद्योगिक क्षेत्रामध्ये एकूण २७ (२५ औद्योगिक व २ व्यापारी) भूखंडाचा आराखडा मंजूर झालेला असून २७ भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे. अद्यापपर्यंत एकही उद्योग कार्यान्वित नसल्याचे दिसून येते. तथापि, गोंडपिंपरी औद्योगिक क्षेत्रामध्ये रस्ते, वीज इ. सोयीसुविधा उपलब्ध असून पाणीपुरवठा बोअरवेल मार्फत करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

पंचायत समिती कार्यालय केज (जि. बीड) यांनी फर्निचरची कामे निकृष्ट दर्जाची केली असल्याबाबत

(१५) २४४९ (०५-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंचायत समिती कार्यालय केज (जि. बीड) यांनी फर्निचरचे काम अंकित कॉटेज इंडस्ट्रिज, छत्रपती संभाजी नगर यांना ई-निविदेची रक्कम रुपये १,७५,१८३२६ अंदाजपत्रक दरापेक्षा ०.८१% कमी दराने मंजूर करण्यात आली आहे व सदर कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक १६ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्या सुमारास दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे सुरु असून झालेले काम हे अंदाजपत्रकाप्रमाणे करण्यात आले नाही तसेच कंत्राटदराने तयार (रेडीमेड) फर्निचर आणून टाकले ते सुध्दा निकृष्ट दर्जाचे असल्याने उक्त कंत्राटदारावर कार्यवाही करून सदर काम अंदाजपत्रका प्रमाणे चांगल्या दर्जाचे करणे बाबतची मागणी श्री.भगवान केदार यांनी शासनाकडे केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, पंचायत समिती कार्यालय,अंबाजोगाई येथेही असाच प्रकार सुरु असून त्या ठिकाणीही तयार (रेडीमेड) फर्निचर आणून काम निकृष्ट दर्ज्याचे करण्यात येत आहे त्यामुळे जिल्ह्यात इतर ठिकाणी अशीच निकृष्ट दर्ज्याची कामे होत असतील तर त्याची चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सचिव, ग्रामविकास विभाग, मुंबई. यांचेकडे दिनांक १९/१२/२०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्याअनुषंगाने संबंधित कंत्राटदारावर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१६-०९-२०२५) : (१), (२) व (३) ग्राम विकास विभागाच्या दिनांक २० जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये, पंचायत समिती, केज (जि. बीड) येथील नवीन प्रशासकीय इमारतीकरीता फर्निचर या उपकामाच्या रु.१९३.०० लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. प्रस्तुत कामाचा कार्यारंभ आदेश अंकित कॉटेज इंडस्ट्रीज, छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात आला आहे. सदरचे काम प्रगतीपथावर असून मुळ अंदाजपत्रकानुसार गुणवत्तपुर्वक पुर्ण झाल्यानंतरच जिल्हा परिषदेकडून प्रस्तुत कामाचे देयक देण्याची दक्षता घेण्यात येईल.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (ता.अंबाजोगाई,जि. बीड) येथील आरोग्य विषयक समस्यांचे निराकरण करणेबाबत

(१६) २४५० (०५-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (ता.अंबाजोगाई, जि. बीड) येथे मोठ्याप्रमाणात ह्रदया संबंधी रुग्ण येतात तथापि, या ठिकाणी ह्रदया संबंधी शस्त्रक्रिया होत नसल्याने या आजारासंबंधी गंभीर रुग्णांना लातूर येथे खाजगी रुग्णालयात संदर्भित (रेफर) करावे लागत असल्यामळे सदर रुग्णालयाला पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ली., नागपूर यांच्या CSR फंडामधून कार्डियाक रुग्णवाहिका उपलब्ध करून देणे बाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी संचालक, पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ली., पश्चिम क्षेत्र-१, नागपूर. यांचेकडे दिनांक १३ जानेवारी,२०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे व जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक १८डिसेंबर,२०२४ रोजी वा त्यासुमारास शिफारस केली आहे. हे खरे आहे काय,
(२) तसेच, येथे हृदयरोगाशी संबंधित शस्त्रक्रियेसाठी ॲन्जीओग्राफी व ॲन्जीओप्लास्टी करण्यासाठी मशीन्स उपलब्ध आहेत परंतु त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नाही. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे ह्रदया संबंधी गंभीर रुग्णांना लातूर येथे संदर्भित केले जातेने तसेच, रुग्णवाहिकेमध्ये

आवश्यक सुविधा नसल्यामुळे उपचारपूर्वीच जीवित हानी होत असल्यामुळे सदर रुग्णालयात ह्दयरोगाशी संबंधित शस्त्रक्रियेसाठीच्या ॲन्जीओग्राफी व ॲन्जीओप्लास्टी या मशीन्स साठी ह्दयरोग तज्ञ, डॉक्टर्स व टेक्निशियन उपलब्ध करून देणे बातची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक १६ फेब्रुवारी,२०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे. हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, येथे ३० खाटांचे न्युरोसर्जरी विभागास आवश्यक असलेले मनुष्यबळ, यंत्रसामुग्री, स्वतंत्र वार्ड व शस्त्रक्रियागार सह मंजूर करणेबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांनी त्यांचे पत्र.क्र. ३४४० दिनांक ११/०६/२०२४ अन्वये शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१०-११-२०२५) : (१), (२), (३) होय.

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई येथे स्वतंत्र हृदयरोग विभाग, तज्ज्ञ डॉक्टर व कार्डियाक रुग्णवाहीका उपलब्ध नसल्यामुळे येथे हृदयरोगाशी संबंधित शस्त्रक्रिया सध्या करण्यात येत नाहीत. अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टीसाठी आवश्यक DSA मशीन उपलब्ध असले तरी प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभाव आहे. त्यामुळे, या संस्थेत PPP (सार्वजनिक-खाजगी भागीदारी) तत्वावर कार्डिओलॉजी सुपरस्पेशालिटी CVTS युनिट स्थापन करण्यासाठी RFP तयार करून शासन मान्यतेसाठी सादर करण्याच्या सूचना संचालनालयास दिनांक २३.११.२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

(४) स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई येथे न्युरोसर्जरी विभाग सुरू करण्याबाबत संस्थेने दिनांक १२.०६.२०२४ रोजी सादर केलेल्या प्रस्तावातील त्रुटींचा खुलासा संचालनालयामार्फत दिनांक १८.११.२०२४ रोजी शासनास सादर करण्यात आला असून, सदर संस्थेत न्युरोसर्जरी विभाग सुरू करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

सदर विभागाकरीता आवश्यक पदांच्या निर्मितीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

मेहकर (जि.बुलढाणा) येथे एमआयडीसी अंतर्गत प्रकल्प सुरु करणेबाबत

(१७) २४५७ (१७-०४-२०२५). श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर व लोणार (जि.बुलढाणा) येथे सन १९८९ यावर्षी एमआयडीसी करिता २१ हेक्टर इतकी जागा देण्यात आली तथापि तेथे काही जागा सोडल्यास उर्वरित जागेवर अतिक्रमण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ मिळण्यासाठी, बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होणेसाठी व व्यावसायिक उद्योजक यांना उद्योग वाढीसाठी तेथे एमआयडीसी अंतर्गत प्रकल्प सुरु होणे आवश्यक असतांना येथे उद्योग प्रकल्प सुरु झाले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार तेथील अतिक्रमण काढून या ठिकाणी उद्योग उभारणीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (१६-०७-२०२५) : (१) अशंत: खरे आहे. मेहकर लघु औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेसाठी मौजे-मेहकर भाग-१ येथील एकूण २१.२७ हे.आर सरकारी क्षेत्रास मऔवि अधिनियम, १९६१ मधील कलम २ खंड (ग) ची अधिसुचना दि.१८/०१/१९८९ रोजी लागू करण्यात आलेली आहे. सदरहू अधिसुचित क्षेत्राचा ताबा जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे दि.१६/०२/१९८९ च्या आदेशान्वये म.औ.वि. महामंडळास प्राप्त झालेला आहे.

सदरहू संपादित क्षेत्रापैकी अंदाजे १० हेक्टर आर जमिनीवर मेहकर येथील काही लोकांनी अनाधिकृतपणे अतिक्रमण केले होते.तथापि सदरील अतिक्रमण दि.०७.०५.२०२५, दि. ०८.०५.२०२५ व दि. ०९.०५.२०२५ रोजी म.औ.वि. महामंडळामार्फत निष्कासित करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत सदर क्षेत्र महामंडळाच्या ताब्यात आहे

(२) मेहकर औद्योगिक क्षेत्रातील उपरोक्त प्रमाणे असलेले अतिक्रमण वगळता उर्वरीत क्षेत्रावर आरेखित करण्यात आलेले भुखंड महामंडळाचे प्रचलीत धोरणानुसार गरजू उद्योजकांना वाटप करण्यात आलेले आहेत. आजमितीस मेहकर औद्योगिक क्षेत्रात एकुण ५७ आरेखित भुखंडापैकी ४२ भुखंड उद्योजकांना वाटप करण्यात आलेले आहेत. सदर वाटप करण्यात आलेल्या भुखंडापैकी एकुण ०८ भुखंडावर उत्पादन सुरू असल्याचे दिसून येते.

(३) मेहकर औद्योगिक क्षेत्रातील अज्ञात लोकांनी अनाधिकृतपणे केलेले अतिक्रमण दि.०७/०५/२०२५ ते दि.०९.०५.२०२५ रोजी निष्कासित करण्याची कार्यवाही महामंडळामार्फत पूर्ण करण्यात आलेली आहे.सद्यस्थितीत सदर जमीन महामंडळाच्या ताब्यात असुन आरेखित भुखंडाचे वाटपानुसार वाटपग्रहीस भुखंडाचा ताबा सुपूर्द करण्याची कार्यवाही सुरू आहे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

केज (जि.बीड) या तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक शाळेत अनुपस्थित अनुपस्थित राहत असल्याबाबत

(१८) २४६३ (०५-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.जोगदंड पी. बी. (स.शि.) जि. प. प्रा. शा. येवता (ता. केज, जि.बीड) हे शाळेमध्ये नियमितपणे हजेरी पटावर सह्या करून अनुपस्थित राहत असून, त्यांना वारंवार सूचना देऊनही ते शाळेत पूर्ण वेळ उपस्थित राहत नसल्याने त्यांना मार्गदर्शन करणेबाबतची मागणी मुख्याध्यापक यांनी गटशिक्षणधिकारी (ता. केज) यांच्याकडे दिनांक ४ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच श्री. जोगदंड पी. बी. यांच्या सततच्या अनुउपस्थीमुळे विद्यार्थांच्या अध्यापनावर मोठा परिणाम होत असल्याच्या तक्रारी पालक वर्गातून होत असल्याचे त्यांची त्वरित चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शिक्षणाधिकारी, बीड. यांच्याकडे दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, श्रीमती, कसबे. ए.एस. (स.शी) जि.प.प्रा.शा. सावळेश्वर पैठण, (ता. केज, जि.बीड) हे शाळेत अनियमितपणे येत असून विद्यार्थ्यांना अध्यापन करत नसल्याच्या तक्रारी असल्याने उक्त प्रकरणी गटशिक्षणाधिकारी (ता. केज, जि.बीड) यांनी चौकशी करून कार्यवाही साठी अहवाल शिक्षणाधिकारी (प्रा), जि.प. बीड. यांचेकडे सादर केला आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी अहवालानुसार संबंधीतावर त्वरित कार्यवाही करणे बाबतची मागणी

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शिक्षणाधिकारी (प्रा), जि.प. बीड. यांच्याकडे दिनांक ११/०२/२०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने संबंधीत शिक्षकांविरुध्द कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (०९-०९-२०२५) : (१),(२),(३) व (४) होय, हे खरे आहे.
(५) i) श्री.जोगदंड पी.बी., सहशिक्षक यांच्या अनुपस्थितीबाबत गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती केज यांनी दि.०७.०२.२०२५ रोजी दिलेला चौकशी अहवाल व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या दि.२१.०१.२०२५ रोजी व इतर दिलेल्या निवेदनांनुसार श्री.जोगदंड यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांचे दि.२८.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस दिलेली होती. सदर नोटीशीच्या अनुषंगाने श्री.जोगदंड यांनी दि.१०.०३.२०२५ रोजी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती केज यांच्यामार्फत सादर केला असून तद्नुषंगाने त्यांना जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे.

ii) तसेच गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती केज यांनी दि.२७.०१.२०२५ रोजी सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने श्रीम.कसबे ए.एस., सहशिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावळेश्वर पैठण, ता.केज यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांच्या दि.१२.०२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती केज यांच्या दि.२१.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये श्रीम.कसबे यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्या दि.१३.०८.२०२५ रोजीच्या आदेशान्वये संबंधितांना जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

अमरावती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात कंत्राटी पद्धतीने बाहयस्त्रोत मनुष्य पुरवठा करणेबाबत

(१९) २४९९ (२८-०४-२०२५). श्री.रवी राणा (बडनेरा) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील अधिष्ठाता यांनी त्यांच्या कार्यालयीन पत्र क्रमांक १४५२ दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये कंत्राटी पद्धतीने बाहयस्त्रोत मनुष्य पुरवठा करणाऱ्या व साफसफाई कंत्राटदाराची टीम कर्मचारी मागणी मे. क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्विसेस लिमिटेड मुंबई या संस्थेस केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आयुक्त वैद्यकीय शिक्षण व आयुष, महाराष्ट्र राज्य या शासकीय कार्यालयाकडून संबंधित क्रिस्टल एजंसी सर्व्हिसेस लिमिटेड यांना कार्यारंभ आदेश दिनांक १७ नोव्हेंबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये दिले असूनही त्याप्रमाणे एजंन्सीने कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित एजन्सी मनुष्यबळ पुरवठा करण्याचे निकष काय आहेत,
(४) असल्यास, शासनाच्या अधिनस्त असलेल्या संबंधित यंत्रणेने मनुष्य पुरवठा केला आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१०-११-२०२५) : (१) होय.
(२) नाही.
(३) संबंधित सेवापुरवठादारांने गट क व गट ड च्या पदांच्या अर्हता पूर्ण करत असलेला उमेदवार उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झालेली आहे.
(४) होय, सदर सेवापुरवठादाराने मागणी प्रमाणे मनुष्यबळ पुरवठा केला आहे.
(५) लागू नाही.

धाराशिव जिल्हयातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व आयुर्वेदीक महाविद्यालयात येणाऱ्या रुग्णांची होत असलेली गैरसोय

(२०) २५३४ (२८-०४-२०२५). डॉ.तानाजी सावंत (परांडा) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशिव जिल्हयातील वैद्यकीय महाविद्यालयाचा पदभार नविन अधिष्ठाता यांनी स्विकारल्यानंतर त्यांनी बाहयरुग्ण विभागातील (ओपीडी) सेवा दुपार नंतर बंद केल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे दिनांक २८ जानेवारी, २०२५ रोजी किंवा त्या सूमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्हा हा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा जिल्हा म्हणून ओळखला जात असून जिल्हयातील ग्रामीण भागातून जिल्हयापर्यंत येईपर्यंत सदर वैद्यकीय महाविद्यालयातील बाहयरुग्ण विभागातील (ओपीडी) सेवा बंद होते असल्यामुळे रुग्णांना खाजगी रुग्णालयात जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, जिल्हयातील शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालयात नियमित रेडीओलॉजिस्ट नसणे,योग्य प्रशिक्षत कर्मचारी नसणे,एक्सरेच्या फिल्मची सातत्याने मागणी करुनही उपलब्ध होत नसल्याने रुग्णांना एक्सरेचा फोटो मोबाईलमध्ये घेण्यास रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात येणे, निधी अभावी औषधे उपलब्ध होत नसल्यामुळे रुग्णांना बाहेरुन औषधे प्रशासनाकडून लिहून दिले जाणे तसेच रुग्णालयाच्या एका कक्षात नियमित तीन डॉक्टर असूनही सकाळी बाहयरुग्ण येण्याच्या वेळेत सदर डॉक्टर राऊंडवर गेल्याचे सांगून परिणामी प्रशिक्षित विद्यार्थ्यांकडून तपासणी केली जात असल्याने रुग्णांचे योग्य रोग निदान होत नसणे, निधी उपलब्ध न होणे अशा अनेक समस्यांमुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार धाराशिव जिल्हयातील शासकीय महाविद्याल व आयुर्वेदीक महाविद्यालयात येण्याऱ्या रुग्णांना आरोग्य सेवा सुरळीत मिळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१०-११-२०२५) : (१) व (२) हे खरे नाही.
शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी संलग्न रुग्णालयांच्या बाह्यरुग्ण विभागाची वेळ सकाळी ०८.०० ते दुपारी १.०० अशी निश्चित आहे. या वेळेनंतर येणाऱ्या रुग्णांना अपघात कक्ष (Casualty) आणि अतिदक्षता विभाग (ICU) येथे २४ तास रुग्णसेवा उपलब्ध करून देण्यात येते
(३) व (४) शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, धाराशिव प्रशासनाला तातडीने त्रुटी दूर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व आयुर्वेदिक रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना उत्तम आरोग्य सुविधा देण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून करण्यात येत असून आता सर्व वार्ड सुरळीतपणे सुरु आहेत. रुग्ण किंवा त्यांचा नातेवाईकांकडून कोणत्याही लेखी तक्रारी रुग्णालय प्रशासनाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

धाराशिव जिल्हयातील ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांना वेतन मिळण्याबाबत

(२१) २८४४ (१८-०४-२०२५). डॉ.तानाजी सावंत (परांडा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव जिल्ह्यातील ६२२ पेक्षा अधिक ग्रामपंचायतीच्या १८०० कर्मचाऱ्यांना माहे ऑगस्ट, २०२४ पासून वेतन मिळाले नसल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने ग्रामपंचायतीच्या अधिकारात वाढ केल्याने कार्यरत कर्मचाऱ्यांच्या कामांची व्याप्तीही वाढविलेली असून त्यांना मिळणाऱ्या वेतनाच्या ८.३३ टक्के भविष्य निर्वाह निधी हा संबंधीत ग्रामपंचायतीच्या खात्यात जमा करीत नाहीत किंवा ४,३०० रुपये मिळणारा निवासी भत्ता सन २००७ पासून दिला गेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुषंगाने सदर कर्मचाऱ्यांना त्यांचे वेतन तात्काळ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (३०-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) होय, हे अंशतः खरे आहे.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना ८.३३ % प्रमाणे भ.नि.नि चा कर्मचारी हिस्सा त्यांचे खात्यावर जमा करण्यात आला असून उर्वरित ग्रामपंचायत हिस्सा व वेळोवेळी शासन सूचने प्रमाणे अनुज्ञेय राहणीमान भत्ता ग्रामनिधीमधून देणे आवश्यक आहे. तथापि याप्रमाणे भविष्य निर्वाह निधीची, ग्रामपंचायतीकडून एकूण देय रक्कमे पैकी अद्यापि काही रक्कम ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना अदा न केल्याचे दिसून आल्याने सर्व ग्रामपंचायतींना उक्त प्रमाणे शिल्लक देय भविष्य निर्वाह निधीची ८. ३३ % ग्रामपंचायत हिस्सा तसेच राहणीमान /विशेष भत्ता संबंधित ग्रामपंचायत कर्मचारी यांना तात्कळ अदा करणे बाबत पुनश्च सूचना देण्यात आलेल्या असून त्यांच्या अमलबजावणी बाबत पाठपुरावा सुरु आहे.

(४) कोविड-२०१९ मुळे आर्थिक वर्ष सन २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये वसुलीचे प्रमाण कमी असणे तसेच इतर आर्थिक वर्षात १०० % वसुली न होणे तसेच वसूल रक्कमेतून गावातील इतर आवश्यक बाबीवर करावा लागणारा खर्च यामुळे ग्रामनिधी मध्ये निधी उपलब्धतेच्या अभावी ग्रामपंचायतचा उर्वरित भ.नि.नि हिस्सा व उर्वरित राहणीमान भत्ता अदा करण्यास विलंब झाल्याचे दिसून येते.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेत कंत्राटी पध्दतीने भरण्यात आलेली कनिष्ठ अभियंता पदे सेवेत कायम स्वरूपी करणेबाबत

(२२) २८७७ (२४-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेत जाहिरातीद्वारे बिंदुनामावलीनुसार कंत्राटी पध्दतीने भरण्यात आलेली कनिष्ठ अभियंता पदे सेवेत कायम स्वरूपी करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी मा. ग्रामविकास मंत्री, यांना दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१०-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) सन्माननीय लोकप्रतिनिधींच्या निवेदनातील विनंतीच्या अनुषंगाने दि.११.०२.२०२५ रोजी मा.मंत्री (ग्राम विकास) यांच्याकडे बैठक आयोजित करण्यात आली होती. तथापि, प्रशासकीय कारणास्तव सदर बैठक होऊ शकली नाही.

त्यामुळे याबाबत पुन्हा मा.मंत्री (ग्राम विकास) यांच्याकडे बैठक आयोजित करण्याचे प्रस्तावित असून प्रस्तुत प्रकरणी बैठकीतील निर्देशानुसार पुढील कार्यकारी करण्याचे संकल्पित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

सरपंच व उपसरपंच यांचे मानधनात वाढ करणेबाबत

(२३) ३०८३ (०५-०५-२०२५). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.दिलीप सोपल (बार्शी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सरपंच व उपसरपंच यांचे मानधन दुप्पट करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेवून त्याप्रमाणे ग्रामविकास विभागाने दिनांक २४ सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान शासन परिपत्रक निर्गमित करुनही गेल्या अनेक महिन्यांपासूनचे सरंपच व उपसरंपच यांना अद्यापही जुने मानधन मिळाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अघापपर्यंत जुनेच थकीत मानधन मिळत नसतांना ग्रामविकास विभागाने नविन शासन परिपत्रक काढून सरंपच व उपसरंपच यांचे मानधन दुप्पट करण्याचा निर्णय शासनाने घेतला असता ते सुध्दा मानधन अद्यापही मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, ग्रामीण भागात गावांचा सर्वांगीण विकास व्हावा अशी तरतूद ग्रामपंचायत स्तरावर केली जाते, याकरिता सरपंच आणि उपसरपंच या पदाचे मानधन गेल्या ०३ महिन्यांपूर्वी वाढविण्यात आले असून वाढीव मानधन अद्याप कागदावर असल्याची टीका जव्हार (जि. पालघर) तालुक्यातील ४८ ग्रामपंचायतींमधील सरपंच आणि उपसरपंच करीत आहेत व ते वेळेवर मिळत नसल्याने त्यांच्यामध्ये तीव्र नाराजी परसली असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुषंगाने सरपंच व उपसंरपच यांना त्यांचे थकित मानधन व दरमहा नियमितरित्या मानधन अदा करणेबाबत   शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (०६-१०-२०२५) : (१) व (२) हे खरे नाही.

शासन स्तरावरून ऑक्टोबर, २०२५ पर्यंतचे मानधन संचालक पंचायतराज पुणे यांना वर्ग केले असून त्यांनीही सदरचे अनुदान जिल्हा परिषदांना मागणीनुसार वर्ग केले आहेत जिल्हा परिषदांनी तपासून पंचायत समिती

स्तरावर सदरचे अनुदान सरपंच व उपसरपंच यांना वितरित केले आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील सरपंच व उपसरपंच यांनी मानधनाबाबत कोणतीही लेखी तक्रार तालुका व जिल्हा कार्यालयाकडे अद्याप पर्यंत केलेली नाही. त्यामुळे नाराजी पसरली असल्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

अंबड, सातपूर (जि.नाशिक) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रकल्पातील गाळयांच्या लिलाव प्रक्रियेत आलेल्या तांत्रिक अडचणीबाबत

(२४) ३२५४ (१७-०४-२०२५). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड-सातपूर (जि.नाशिक) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रकल्पातील ७० गाळयांची लिलाव प्रक्रिया तांत्रिक घोळामुळे अडचणीत आल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे उद्योजकांनी नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर ७० गाळे लिलाव प्रक्रिया राबवताना जुन्या दराची लिलाव प्रक्रिया राबविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (०५-०९-२०२५) : (१) व (२) होय, हे अशंतः खरे आहे.

अंबड (नाशिक) औद्योगिक क्षेत्रातील एकूण १५१ औद्योगिक व ५ व्यापारी गाळे असे एकुण १५६ गाळयाकरीता निविदांची जाहिरात दि. ३१/०७/२०२४ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार सदर गाळयांकरीता निविदा प्राप्त करण्यास दि.३१/०७/२०२४ ते १४/०८/२०२४ असा अवधी देण्यात आला होता.

तसेच निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी म. औ. वि. महामंडळाने मे. सॉफ्टेक या कंपनीची नियुक्ती केली होती. नियुक्त केलेल्या कंपनीकडून upload केलेल्या निविदांच्या माहितीमध्ये तांत्रिक बाबींमुळे चुका झाल्या होत्या. सदर चुका ह्या दुरुस्त करणे शक्य नसल्यामुळे प्रस्तृत निविदा प्रक्रिया रद्द करणेत आली. प्रकरणी उद्भवलेल्या तांत्रिक अडचणीमुळे सदर निविदा रद्द करण्यात आल्या असून, निविदाधारकांनी भरणा केलेल्या निविदेची अनामत रक्कम (EMD) परत करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे.

तदनंतर अंबड (नाशिक) औद्योगिक क्षेत्रातील एकूण १५१ औद्योगिक व ५ व्यापारी गाळे असे एकुण १५६ गाळयाकरीता निविदांची जाहिरात दि. ३१/०७/२०२४ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार सदर गाळयांकरीता निविदा प्राप्त करण्यास दि.३१/०७/२०२४ ते १४/०८/२०२४ असा अवधी देण्यात आला होता.

तदनंतर शासनाच्या महाटेंडर पोर्टलवर दि.१७/०४/२०२५ रोजी १६२ (१५६ औद्योगिक व ६ व्यापारी) गाळयांकरीता वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन ऑनलाईन पध्दतीने गाळयांचे वाटप करण्यासाठी अर्ज मागविण्यात आले .

सदर निविदा प्रक्रियेमध्ये १७ गाळयासाठी देकार प्राप्त झाले असून त्यांनी सादर केलेल्या तांत्रिक लिफाप्यातील कागदपत्राची छाननी करण्यात आलेली असून पात्र निविदाकार यांनी सादर केलेल्या वाणिज्य लिफाफा उघडण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

प्रादेशिक अधिकारी,म.औ.वि.महामंडळ, नाशिक यांनी वेळोवेळी संबंधित उद्योजकांशी संवाद साधून आलेल्या तांत्रिक अडचणीचे निराकरण केलेले आहे

(३) वर नमूद केल्यानुसार प्रस्तुत प्रकरणी निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणींचे निराकरण करण्यात आले असून, सदर निविदा प्रक्रीया रद्द करुन ज्या उद्योजकांनी अर्ज सादर केले होते त्या उद्योजकांना ऑनलाईन पध्दतीने जमा केलेली इसारा रक्कम परत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शिराळा (ता.शिराळा, जि.सांगली) येथे एमआयडीसी मध्ये अद्ययावत सोयीसुविधा पुरविणेबाबत

(२५) ३२९० (२४-०४-२०२५). श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराळा (ता.शिराळा, जि.सांगली) या डोंगरी विभागातील एमआयडीसी D + या विभागात समाविष्ठ असून सदर ठिकाणी उद्योगांकरीता आवश्यक असलेल्या सोयीसुविधांचा अभाव असल्यामुळे काही कंपन्या बंद झाल्या तर नवीन मोठया कंपन्या त्याठिकाणी येत नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे अहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी रस्त्यांची दुरवस्था, उद्योगांकरीता वीज अखंडीत व उच्च दाबाने पुरविण्यात न येणे, कच्चा व पक्का माल वेळेत पोहचवण्याकरीता दळणवळणाची योग्य सुविधा नसणे याबाबत एमआयडीसीकडे पाठपुरावा करुनही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ठिकाणच्या कंपन्या बंद पडल्याने अनेक उद्योजक कर्जबाजारी झाले असून अनेक स्थानिक युवक बेरोजगार झाल्याने त्यांना अनेक आर्थिक अडचणींचा सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर ठिकाणी BCC चे प्रस्ताव दंडामुळे प्रलंबित असल्याने त्याबाबत नवीन धोरण राबविणे गरजचे असणे, एक्सप्रेस फिडर बसविणे, सब स्टेशनमधील मशनरी / साधने अद्ययावत करण्यासह इतर मुलभूत सोयीसुविधा तातडीने पुरविण्याची उद्योजकांकडून शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार त्याठिकाणच्या उद्योगाला चालना देण्यासह येथील औद्योगिक क्षेत्रात अद्यावत पायाभूत सुविधा उभारण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (०५-०९-२०२५) : (१), (२) व (३) हे खरे नाही.

शिराळा औद्योगिक क्षेत्रामध्ये सर्व प्रकारच्या मुलभूत सोयी सुविधा जसे रस्ते, पथदिवे, पाणी पुरवठा इत्यादी म.औ.वि. महामंडळाकडून पुरविण्यात आलेल्या आहेत.

सदर औद्योगिक क्षेत्रात डांबरी रस्त्यांची सुविधा पुरविण्यात आली आहे. उद्योगांकरिता अखंडीत व उच्च दाबाने वीज पुरविण्याकरिता महावितरण / महापारेषणकडून सबस्टेशन व विद्युत वितरण व्यवस्था करण्यात आली आहे. अखंडीत उच्च दाबाने वीज पुरवठा करणे कामी महावितरणकडून १३२ के. व्ही. सब स्टेशन, पेठ येथून नवीन ३३ के. व्ही. फीडर टाकण्याचे काम चालू असून ते लवकरच पूर्ण होईल असे अपेक्षित आहे.

(४) व (५) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धोरणानुसार भुखंडधारकाने भुखंडाचा विकास करुन विहित मुदती इमारत पुर्णत्वाचा दाखला प्राप्त करुन उत्पादनात जाणे आवश्यक आहे. भुखंडाचा विकास करुन इमारत पुर्णत्वाचा दाखला प्राप्त केला नसल्यास सदर दाखला प्राप्त करण्यासाठी महामंडळाच्या धोरणानुसार सशुल्क मुदत वाढ देण्याचे धोरण आहे.

एक्सप्रेस फिडर बसविणे, सब स्टेशनमधील मशिनरी / साधने अद्ययावत करणे हि कामे महावितरण/ महापारेषण यांचेकडून करण्यात येत आहेत. या कामी शिराळा येथील सबस्टेशन मध्ये ५ एम व्ही ए ट्रान्सफॉर्मर च्या जागी १० एम व्ही ए ट्रान्सफॉर्मर बसवून चालू केला आहे व तेथून विद्युत पुरवठा सुरु आहे.

शिराळा औद्योगिक क्षेत्रामध्ये बंद असणाऱ्या उद्योग घटकांना उद्योग सुरु करण्याबाबत नोटीस निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी काही उद्योग घटकांनी उद्योग सुरु केलेले असून इतर प्रकरणामुळे (न्यायालयीन बाबी व आर्थिक मंदीमुळे) काही उद्योग बंद आहेत.

शिराळा औद्योगिक क्षेत्रामध्ये सर्व प्रकारच्या मुलभूत सोयी सुविधा जसे रस्ते, पथदिवे, पाणी पुरवठा इत्यादी म.औ.वि.महामंडळाकडून पुरविण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

मराठवाड्यात मुलींचा जन्मदर वाढवा यासाठी करावयाच्या उपाययोजना

(२६) ३३५३ (२५-०४-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाकडून "बेटी बचाव, बेटी पढाव" हा नारा सातत्याने देत असून देखिल मराठवाड्यातील छत्रपती संभाजीगर, जालना, परभणी, हिंगोली, बीड या जिल्ह्यात मागील काही काळात मुलींचा जन्मदर घटत ८८२ पर्यंत आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलींच्या जन्मदरात घट होण्याचे मुख्य कारण म्हणजे स्त्री भ्रूण हत्या व लिंग निवड आहे, हे ही खरे आाहे काय,

(३) असल्यास, मराठवाड्यात मुलींचा जन्मदर वाढवा यासाठी शासनाने कोणते कठोर निर्णय घेतले आहेत वा घेण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे (०५-०८-२०२५) : (१) हे अशंत: खरे आहे.

(२) व (३) मुलीच्या जन्मास प्रोत्साहन देवून मुलींचा जन्मदर वाढविणे, मुलींच्या शिक्षणास चालना देणे, मुलींच्या मृत्यू दर कमी करणे इ. करीता लेक लाडकी, बेटी बचाव बेटी पढाव, प्रधानमंत्री मातृवंदना योजना इ. अंतर्गत उपयोजना राबविण्यात येत आहेत.

सदर योजनेंतर्गत मुलींचा जन्मदर वाढविण्याच्या दृष्टिकोनातू जनजागरण मोहिम राबविण्यात येते.

राज्यात मुलींच्या जन्मदर वाढावा यासाठी प्रसूतीपूर्व व गर्भलिंग निदान कायदा (PCPNDT) या कायद्यातंर्गत पथकामार्फत कारवाई करण्यात येते. तसेच सदर कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे:-

१. राज्यामध्ये पीसीपीएनडीटी टोल फ्री हेल्प लाईन क्र. १८००-२३३-४४७५/१०४ असून, राज्यातील कोणतीही व्यक्ती या अधिनियमाचे उल्लंघन होत असल्याबाबत तक्रार नोंदवू शकतो.

२. खबरी बक्षीस योजनेंतर्गत पीसीपीएनडीटी व एमटीपी या अधिनियमांचे उल्लंघन होत असल्याची खबर देण्याऱ्या व्यक्तीस जर खबर खरी असेल तर रु.१.०० लक्ष इतके बक्षीस देण्यात येते.
३. सोनोग्राफी व तत्सम केंद्रांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी व नुतनीकरण करण्यासाठी संकेतस्थळ सुरु करण्यात आले असून प्रत्येक सोनोग्राफी मशीनला मशीन नोंदणी क्रमांक देण्यात येतो.
४. तपासणी करण्यात येणाऱ्या रुगांची नोंदणी ऑनलाईन करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

असंघटित कामगारांची धोरणे व त्यांच्या इतर मागण्याबाबत

(२७) ३४५० (१९-०४-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील असंघटित कामगारांसाठी सध्या कोणती धोरणे आणि कल्याणकारी योजना लागू आहेत तसेच या योजनांच्या अंमलबजावणीसाठी शासन कोणती उपाययोजना करीत आहे,
(२) असल्यास, असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा योजना, आरोग्य विमा, पेन्शन, अपघात विमा इत्यादी लागू करण्यात आले आहेत काय, त्यांचा लाभ अधिकृतपणे कसा देण्यात येतो,
(३) तसेच, कामगारांना रोजगाराच्या सुरक्षिततेसाठी व योग्य वेतन मिळवण्यासाठी कोणते कायदे लागू केले आहेत तसेच सदर कामगारांची नोंदणी करून त्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(४) असल्यास, असंघटित कामगारांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी कोणत्या योजना आहेत, ज्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढू शकेल व त्यांना अधिक चांगल्या रोजगाराच्या संधी मिळू शकतील तसेच कामगारांना थेट आर्थिक मदत किंवा सामाजिक सुरक्षेच्या कक्षेत आणण्यासाठी शासन कोणत्या नवीन योजना राबवत आहे,
(५) असंघटित कामगारांसाठी महिलांसाठी विशिष्ट तरतुदी आणि कल्याणकारी योजना कोणत्या आहेत, तसेच शासन असंघटित कामगारांचे हक्क सुरक्षित करण्यासाठी वेगळे कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याचा विचार करत आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

अ‍ॅड. आकाश फुंडकर (०१-०८-२०२५) : (१), (२), (३) व (४) राज्यातील असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा व विविध कल्याणकारी योजनांचे लाभ मिळण्यासाठी महाराष्ट्र राज्य असंघटित कामगार-कल्याण महामंडळ व त्याचे अंतर्गत परिशिष्ट-१ मधील उद्योग/व्यवसाय क्षेत्रनिहाय ३९ आभासी (Virtual) मंडळे स्थापन करण्यास शासन निर्णय दि.०६.०७.२०२३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.
भविष्यात असंघटीत क्षेत्रातील कामगारांना व त्यांच्या कुटूंबियांना आभासी मंडळामार्फत योजनांचा लाभ देण्यात येणार आहे.
(५) घरेलू कामगार मंडळामार्फत सद्यस्थितीत घरेलू कामगार महिलांसाठी पुढीलप्रमाणे योजना कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत :-
(अ) महिला लाभार्थीकरिता प्रसुती लाभ (ब) महिला लाभार्थीचा मृत्यू झाल्यास कायदेशीर वारसाला अंत्यविधी सहाय्य (क) सन्मानधन योजना (ड) महिला घरेलू कामगार लाभार्थीला भांडी वाटप संच.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

समुदाय आरोग्य अधिकारी संघटनांच्या मागण्यांबाबत

(२८) ३५६६ (३०-०४-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आयुष्मान भारत, प्रधानमंत्री जनआरोग्य, महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य, वयोश्री इत्यादी आरोग्य संदर्भातील महत्त्वपूर्ण योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवणे व त्यासाठी सर्व मदत करणे तसेच ग्रामपातळीवरील आरोग्य सेवा सक्षमीकरणामध्ये समुदाय आरोग्य अधिकारी (CHO) संवर्गाचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण असून सध्याच्या परिस्थितीत या संवर्गास विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समुदाय आरोग्य अधिकारी हे पद कंत्राटी स्वरुपाचे असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सहा वर्ष पूर्ण केलेल्यांचे समावेशन अथवा नियमितीकरण राज्य शासनामार्फत केले जात असून इतर राज्यात त्या पद्धतीने या समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे समावेशन झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समुदाय आरोग्य अधिकारी या पदांचे आरोग्य विभागांतर्गत नियमित सेवेत पदनिर्मिती करुन नोकरीत समावेशन करणे,मानधन वाढविणे, लॉयल्टी बोनस लागू करणे, मोबदला रद्द करुन मासिक वेतन प्रणाली सुरु करावी, बदली प्रक्रिया सुरु करावी, कंत्राटी कर्मचाऱ्यांना EPF सुविधा लागू करुन त्यांना निवृत्तीपर्यंत आर्थिक सुरक्षितता प्रदान करावी तसेच भत्ते, अनुकंपा, नियुक्त्या, आरोग्य विमा इ. प्रमुख मागण्या त्यांनी शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू मागण्यांची पूर्तता करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे माहे जानेवारी, २०२५ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे समावेशन अथवा नियमितीकरण तसेच इतर मागण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर (०७-१०-२०२५) : (१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी समुदाय आरोग्य अधिकारी यांचे योगदान महत्वाचे आहे. परंतु, या संवर्गास विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब खरी नाही.

(२) केंद्र शासनाच्या समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या career progression बाबतच्या मार्गदर्शक सुचना आहेत. मात्र समावेशनाबाबत सुचना नाहीत. इतर राज्यांकडून या पध्दतीने समुदाय आरोग्य अधिकारी यांचे समावेशन अथवा नियमितीकरण झाले असल्याबाबतची माहिती घेणे सुरु आहे.

(३) हे खरे आहे.

(४) या संदर्भात लोकप्रतिनिधींची काही निवेदने प्राप्त झालेली आहेत.

(५) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत समुदाय आरोग्य अधिकारी हा संवर्ग कंत्राटी स्वरुपात कार्यरत आहे. राज्यामध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी ज्यांच्या १० वर्ष सेवा कालावधी पूर्ण झालेला आहे, अशा पात्र कर्मचाऱ्यांना शासन सेवेमध्ये समायोजन बाबत कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

परभणी जिल्ह्यातील ग्रामपंचायती स्वसंपादित उत्पन्नातून मागासवर्गीय कल्याणार्थ राखीव निधी ठेवणेबाबत

(२९) ३५७९ (२४-०४-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या स्वसंपादित उत्पन्नातून मागासवर्गीय कल्याणासाठी १५ टक्के राखीव निधी ठेवण्याबाबतचे नियम आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील २.१८ कोटी रुपयांचा अनुशेष शिल्लक आहे, हे ही खरी आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदरील निधी ग्रामपंचायतींना वाटप करून अनुशेष दूर करणेबाबत जिल्हा परिषदेच्या वतीने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१७-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे

(२) सन २०२३-२४ मध्ये ग्रामपंचायत स्वसंपादीत उत्पन्नातून मागासवर्गीय कल्याणार्थ १५ टक्के मागील अनुशेषासह रु.२१४.५९ लक्ष इतक्या रक्कमेपैकी मार्च २०२४ अखेर रक्कम रुपये १८३.१६ लक्ष (८५.३५ टक्के) खर्च करण्यात आला असून राखीव निधी अनुशेष रुपये ३१.४३ लक्ष इतका आहे,

(३) ग्रामपंचायत स्वसंपादीत १५ टक्के निधी ग्रामपंचायत स्तरावर खर्च करण्यात येतो ग्रामपंचायतींना जिल्हा परिषदेकडून वाटप करण्यात येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

"मनोधैर्य योजनेची" अंमलबजावणी करणेबाबत

(३०) ३५८० (२४-०४-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयासह मराठवाड्यातील पिडीत महिलांना मनोधैर्ययोजनेअंतर्गत अपेक्षित मदत मिळत नसल्याचे सन २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बलात्कार, लैंगिक अत्याचार, ऍसिड हल्ला व इतर अत्याचार प्रकरणी परभणी सह मराठवाड्यातील शेकडोप्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर योजनेअंतर्गत प्रलंबित प्रकरणातील महिलांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे (२०-०८-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) मनोधैर्य योजनेंतर्गत पिडीत महिलांना आर्थिक सहाय्य देण्याकरीता राज्यातील सर्व जिल्हा निधी सेवा प्राधिकरण यांना सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात रु.५४.७४ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात मराठवाडयातील जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांना पुढील प्रमाणे निधी वाटप करण्यात आलेला आहे:-

जिल्हा	वाटप करण्यात आलेला निधी
छ.संभाजीनगर	रु.१,४५,१२,०००/-
जालना	रु.२९,६३,०००/-
परभणी/हिंगोली	रु.५६,४४,०००/-
बीड	रु.१,५०,००,०००/-
नांदेड	रु.३०,०८,०००/-
धाराशिव	रु.५५,४८,०००/-
लातूर	रु.१,६३,००,०००/-

तसेच, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मनोधैर्य योजनेंतर्गत पिडीत महिलांना आर्थिक सहाय्य देण्याकरीता रु.१५.२२ कोटी इतका निधी शासन निर्णय दि.०२.०७.२०२५ अन्वये वितरीत करण्यात आला आहे.

परभणी जिल्ह्यासह राज्यातील अनेक ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत

(३१) ३५८४ (२४-०४-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यासह राज्यातील अनेक ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विविध मागण्यां प्रकरणी आक्रोश मोर्चा काढून सन २०२४ मध्ये लेखी निवेदन सादर करून शासनाचे लक्ष वेधले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना थकबाकीसह राहणीमान भत्ता, निधी, अपघात विमा, किमान वेतन व इतर मागण्या पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (३०-१०-२०२५) : (१) हे अंशतः खरे आहे.
जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर ग्रामपंचायत कर्मचारी यांनी भेटी देऊन त्यांचे प्रलंबित मागण्या सादर करून त्याचा पाठपुरावा केला आहे.
(२) सदर प्रकरणात माहे जून - जुलै -२०२५ पर्यंत ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना त्यांचे नियमित वेतन व भ.नि.नि. तसेच १९ महिन्याचे प्रलंबित थकीत मानधन अदा करण्यात आलेले आहे.
तसेच राहणीमान भत्ता, निधी, अपघात विमा व इतर मागण्या पूर्ण करणेबाबत दि. २७/०२/२०२४ च्या पत्रान्वये जिल्हा परिषद, परभणी सनियंत्रित सर्व पंचायत समिती कार्यालयांना कळविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

चंदगड (जि. कोल्हापूर) तालुक्यातील रस्ते / गावे गोवा राज्याशी जोडणेबाबत

(३२) ३९१४ (२४-०४-२०२५). श्री.शिवाजी पाटील (चंदगड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड तालुक्यातील मौजे कोलीक (इजिमा १६९) व मौजे झांबरे (इजिमा १६२) ही गावे गोवा राज्याशी जोडली आहेत काय,

(२) असल्यास, सदर रस्ते गोवा राज्याशी जोडल्यामुळे शेती व शेतीपूरक व्यवसाय वाढीस मदत होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपायोजना तसेच कार्यवाही केली करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१६-०९-२०२५) : (१) व (२) चंदगड तालुक्यातील मौजे कौलीक येथील इजिमा-१६९ व मौजे झांबरे येथील इजिमा-१६२ हे रस्ते गोवा राज्याशी थेट जोडलेली नाहीत. तथापि,
मौजे कौलीक : मौजे कौलीक या गावाला गोवा राज्याला जोडण्याकरिता कोलीक – तुडीये – हजगोळी फाटा – रा.मा. १८९ कोदाळी – कोल्हापूर जिल्हा हद्द – राज्य हद्द (सिंधुदुर्ग) असा पर्यायी रस्ता (इजिमा-१६९, १६६, १६८ व रा.मा. १८९) उपलब्ध असून त्याची एकूण लांबी ६७.४७५ कि.मी. इतकी आहे.
मौजे झांबरे : मौजे झांबरे या गावाला गोवा राज्याला जोडण्याकरिता झांबरे – चंदगड – राज्य हद्द असा पर्यायी रस्ता (इजिमा-१६२ व रामा-१८९) उपलब्ध असून त्याची एकूण लांबी ५९.५० कि.मी. इतकी आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पिलीव (ता.माळशिरस, जि.सोलापूर) बसस्थानकावरील विहिरीत गटारीचे पाणी सोडल्याने सर्वत्र दुर्गंधी व रोगराई पसरत असल्याबाबत

(३३) ३९५१ (२४-०४-२०२५). श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिलीव (ता.माळशिरस, जि.सोलापूर) बस स्थानकावरील अहिल्यादेवी चौकात ब्रिटीशकालीन वापरात नसलेली जुनी विहीर असून पंढरपूर-म्हसवड महामार्गाचे चौकातील काम गेल्या चार वर्षांपासून अपूर्ण राहिल्यामुळे येथील ग्रामस्थांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्हा बँकेपासून येणाऱ्या गटारीतील घाण पाणी, कर्मवीर विद्यालयातील शौचालयांचे घाण पाणी पुढे जाण्यासाठी गटार नसल्याने हे घाण पाणी साचून सर्वत्र प्रचंड दुर्गंधी पसरत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ग्रामपंचायतीने ही विहिर बुजविण्याची परवानगी दिली असतानाही ठेकेदाराने ते न केल्याने उक्त ठिकाणी डासांचे प्रमाण वाढून रोगराई वाढण्याची शक्यता निर्माण झाली असल्याने स्थानिक नागरिकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती काय आढळून त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (३०-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

सदर विहीर म्हसवड-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग ५४८६ या रस्त्यालगत होती.त्या विहिरीमध्ये ग्रामपंचायतचे सांडपाणी सोडले जात होते.सदर विहीर ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात होती. रस्ता रुंदीकरण कामामध्ये सदरची विहीर आलेली होती.विहीर बुजविणेबाबत ग्रामपंचायतीने दि.२४/०५/२०२२ अन्वये कार्यकारी अभियंता म. रा. र. वि. महामंडळ पुणे यांना कळविले होते. त्यानंतर सदर विहीर कार्यकारी अभियंता म. रा. र. वि. महामंडळ विभागाने बुजविलेली आहे. सध्यस्थितीत सांडपाण्याची व्यवस्था भुयारी गटारीद्वारे लावलेली आहे. सध्या नमूद ठिकाणी कोणतेही सांडपाणी साठत नाही अथवा दुर्गंधी होत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सुधागड (जि. रायगड) तालुक्यातील पिंपळोली नागाव येथील गावांना जोडणारा नदीचा पुल अत्यंत जीर्ण आणि धोकादायक अवस्थेत असल्याबाबत

(३४) ४२८८ (०५-०५-२०२५). श्री.दिलीप लांडे (चांदिवली) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपळोली नागाव (ता.सुधागड,जि. रायगड) येथील गावांना जोडणारा नदीचा पूल अत्यंत जीर्ण आणि धोकादायक अवस्थेत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाचे संरक्षक कठडे नदीत तुटून पडल्याने प्रवासादरम्यान वाहन पुलावर घसरुन नदीत कोसळण्याची शक्यता असून पावसाळयात या नदीला दहा फुटहून अधिक उंचीच्या पाण्याचा वेढा येत असल्याने नागरीकांचे जनजीवन विस्कळीत होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुलाची दुरुस्ती करण्याबाबत नागरीकांनी संबंधितांकडे पत्रव्यवहार करुनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर पुलाची तातडीने दुरस्ती करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१६-०९-२०२५) : (१), (२), (३) व (४) रस्ते विकास आराखडा सन २००१-२०२१ नुसार रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील पिंपळोली मार्ग हा ग्रामीण मार्ग क्र.२६ दर्जाचा असून सदर रस्त्याच्या सा.क्र.०/२०० मध्ये पूल अस्तित्वात आहे.

सदर पुलाचे बांधकाम हे सबमर्सिबल स्वरुपाचे आहे. पूलाची लांबी २५.०० मीटर असून त्याची उंची ३.०० मीटर आहे. पावसाळयामध्ये नदीच्या पाणीपातळीमध्ये वाढ झाल्यास काही वेळासाठी सबमर्सिबल प्रकारच्या पुलावरुन पूराचे पाणी वाहत असते. तेव्हा पूरासोबत वाहून येणारा कचरा, झाडाच्या फांद्या पुलावर अडकून पुलाला धोका निर्माण होऊ नये म्हणून सबमर्सिबल प्रकारच्या पुलाला कठडे लावण्यात येत नाहीत. सद्यःस्थितीत सदर पुल हा धोकादायक नसून पुलावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे. तसेच सदर पुलाच्या डागडुजीसाठी सन २०२५-२६ मध्ये जिल्हा परिषद, सेस अर्थसंकल्पीय अनुदान अंतर्गत रु.१०.०० लक्ष इतक्या रक्कमेची तरतूद करण्यात आली असून सदर काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

लीलावती रुग्णालयाने मुंबईमध्ये ३०० खाटाचे कॅन्सर रुग्णालय उभारणेबाबत

(३५) ४३७१ (०५-०५-२०२५). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कॅन्सर रुग्णांची वाढती रुग्णसंख्या लक्षात घेता लीलावती रुग्णालयाने मुंबईमध्ये ३०० खाटांचे रुग्णालय सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी अमेरिकेतील मेयो क्लिनिकच्या सहकार्याने रुग्णालयातील परिचारिकांना अद्ययावत प्रशिक्षण देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णालयामध्ये अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांची उपलब्धता करुन देण्यात येणार असून, या रुग्णालयाच्या उभारणीसाठी रुग्णालय प्रशासनाने जागा उपलब्ध करण्यासंदर्भात सहाय्य करण्यात येईल असे आश्वासन प्रशासनामार्फत देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर (१३-१०-२०२५) : (१) अंशत: खरे आहे .

मुंबई येथे जागतिक दर्जाचे कर्करोग रुग्णालय स्थापन करणेबाबत संस्थापक, लीलावती रुग्णालय व संशोधन केंद्र मुंबई यांचे पत्र या विभागास प्राप्त झालेले आहे.
(२) लीलावती रुग्णालय हे अमेरिकेतील मेयो क्लिनिकशी समन्वय करुन आवश्यक सहकार्य घेण्याकरीता नियोजन करत आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, लीलावती रुग्णालय यांनी लेखी कळविले आहे.
(३) या विभागामार्फत असे आश्वासन देण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

वरोरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील अरविंदो रिॲलिटी ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.कंपनी व्यवस्थापनाने रस्त्याचे खोदकाम केल्याबाबत

(३६) ४६०९ (२४-०४-२०२५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरोरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील अरविंदो रिॲलिटी ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.कंपनी व्यवस्थापनाने शासनाची कोणतीही मंजूरी न घेता नियमबाहयरित्या मौजा किलोरा-बेलोरा -जेमा इजिमा रस्ता १६ या रस्त्याचे खोदकाम करून बेलोरा, टाकळी, जेमा, पानवडाळा, कानसा, किलोनी या परिसरातील जाण्या-येण्याचा मार्ग बंद केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावांचे पुनर्वसन अद्यापी करण्यात आले नसतानाही कंपनी व्यवस्थापनाने गावातील नागरिकांना वेठीस धरुन मानसिक व आर्थिक त्रास देत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कंपनी विरोधात गावातील नागरिकांनी लोकप्रतिनिधींसह जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी वरोरा यांच्याकडे लेखी तक्रार दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने नियमबाहयरित्या रस्त्याचे खोदकाम करून नागरिकांचा रस्ता बंद करणाऱ्या कंपनीच्या व्यवस्थापनाविरोधात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१६-०९-२०२५) : (१), (२), (३) व (४) चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील किलोणी – बेलोरा – जेणा – कान्सा – पिर्ली – सागरा – बिजोणी – महालगाव – शेगाव रस्ता इजिमा-१६ दर्जाचा आहे. सदर रस्त्याच्या सा.क्र.१/३०० ते १/९०० या लांबीमध्ये मे.अरविंदो रियालिटी अँड इंफ्रास्ट्रक्चर प्रा. लि. कंपनीला खोदकाम करावयाचे असल्याने कंपनीने स्व-खर्चाने पर्यायी वळण रस्ता तयार करुन देण्याच्या अटीवर सदर साखळी क्रमांकातील रस्ता बंद करण्याची रितसर परवानगी जिल्हा परिषदेकडून घेतलेली आहे.

सदर ठिकाणी खोदकामाकरीता ब्लास्टिंग होत असल्यामुळे सा.क्र.१/३०० ते १/९०० मध्ये वाहतुक करणे धोकादायक असल्याने ६०० मीटर रस्ता बंद करण्यात आला असून, सदर साखळी क्रमांकातील वाहतूक कंपनीने नव्याने तयार केलेल्या पर्यायी वळण रस्त्यावरुन वळविण्यात आली आहे. सद्यस्थितीत सदर पर्यायी वळण रस्त्यावरुन वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

टेंभुर्णी (ता.माढा, जि.सोलापूर) येथील ग्रामसचिवालयामधील गाळे धारकांचे गाळे नियमित करण्याबाबत

(३७) ४६७४ (२४-०४-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभुर्णी (ता.माढा, जि.सोलापूर) येथील जुनेग एस टी स्टॅण्ड जवळील ग्रामपंचातीच्या ग्रामसचिवालयामधील ६ गाळेधारकांचे गाळे शासनाने माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सील केले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ६ गाळेधारकांनी शासनाच्या नियमानुसार ग्रामपंचायतीचा ठराव करुन रितसर अनामत रक्कम भरणा केली असतानाही अदयाप गाळेधारकांना गाळे नियमित करुन देण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर गाळेधारकांचे गाळे नियमित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (३०-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली असून चौकशी अंती सदर गाळे वाटपात जिल्हाधिकारी यांचेकडील दि.१४/०७/१९९८ च्या आदेशातील अटी व शर्तीचे पालन करण्यात आलेले नाही व २७ डिसेंबर १९९९ चे शासन निर्णयानुसार वाटप करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.) यांचे २९/०८/२०१८ च्या पत्रान्वये शासन निर्णयानुसार आरक्षण निश्चित करून लिलाव पद्धतीने वाटप करणेसाठी ग्रामपंचायत टेभूर्णी कडून प्रस्ताव मागविण्यात आले होते.

पूर्वीचे ०८ गाळे धारकांपैकी श्री.सिद्राम मारुती आरडे व श्री. सुधीर भगवान घळके यांनी मा.दिवाणी न्यायालय बार्शी यांचेकडे रे.मु.नं. ६/२२ अन्वये व श्री. प्रदीप सखाहारी भालेराव यांनी मा.दिवाणी न्यायालय माढा यांचेकडे स्पे.मु.नं.४५/२३ अन्वये दावा दाखल केलेला आहे. सदर बाबत न्यायालयीन निर्णय प्राप्त झाल्यानंतर न्यायालयीन निर्णय व शासन निर्णयानुसार गाळे वाटत प्रक्रिया पार पाडणे उचित ठरते. सध्या सद्यस्थितीत बाब न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सर जे.जे. रुग्णालयातील,मुंबई येथील मुख्य शल्यचिकीत्सक यांची सुरु असलेली चौकशी पर्ण करणेबाबत

(३८) ४८६७ (२८-०४-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भायखळा येथील सर जे.जे. रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात मुख्य शल्य चिकित्सक पदावर काम करणारे डॉ.मोहम्मद आयुब सिद्दीकी हे खाजगी व्यवसाय करीत असल्याबाबत दोषारोप बजावून दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी पासून त्यांच्यावर सुरु असलेली चौकशीची कार्यवाही अद्यापही पूर्ण झाली नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची सर जे.जे. रुग्णालयातून नागपूर येथे बदली झाली असताना ते दिनांक २१/०६/२०१८ पासून ते सन २०२१ या कालावधीत शासकीय सेवेत रुजू नसल्याने त्यांच्यावर कठोर कारवाई करणेबाबत "आमचा हिंदूस्थान" या साप्ताहिक वर्तमान पत्राचे संपादक श्री.सुधीर हेगिष्टे यांनी मा.मुख्यमंत्री व मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांना दिनांक ०८/०६/२०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देऊनही अद्याप सदर निवेदनावर शासनाने कोणतीच कार्यवाही न करता सदर प्रकरण आर्थिक संगनमताने दडपून टाकत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चोकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०९-०९-२०२५) : (१) डॉ. मोहम्मद आयुब सिध्दीकी हे खाजगी व्यवसाय करत असल्याबाबत त्यांना दिनांक ०८.११.२०१७ रोजी दोषारोप बजावण्यात आले असून त्यांचेविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) डॉ. सिध्दीकी यांच्या दिनांक २१.०६.२०१८ ते दि.१७.०५.२०२१ या कालावधीतील गैरहजेरीच्या अनुषंगाने कारवाई करण्यासंदर्भात श्री. सुधीर हेगिष्टे यांचे निवेदन या कार्यलयात आढळून आले नाही. तथापि, डॉ. सिध्दीकी यांना त्यांच्या सेवा का समाप्त करु नयेत यासंदर्भात दिनांक ०९.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

बुलढाणा व चिखली येथील महिला वसतिगृतील व्यवस्थापना संदर्भात त्रुटी असल्याबाबत

(३९) ४९९६ (२५-०४-२०२५). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा येथील डॉ पंजाबराव देशमुख प्रतिष्ठान द्वारा संचालित श्रीमती द्वारकाबाई महिला वसतिगृह आणि चिखली येथील परमहंस रामकृष्ण मौनी बाबा शिक्षण संस्था द्वारा संचालित नोकरी करणाऱ्या महिलांसाठी अहिल्यादेवी होळकर वसतिगृह आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृहात जिल्हा महिला व बालविकास आयुक्तालयाच्या पथकाने तपासणी केली असता संस्थेच्या व्यवस्थापनासंदर्भात असंख्य त्रुटी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे (०५-०८-२०२५) : (१) होय.
(२), (३) व (४) बुलढाणा येथील डॉ पंजाबराव देशमुख प्रतिष्ठान द्वारा संचालित श्रीमती द्वारकाबाई महिला वसतिगृह आणि चिखली येथील परमहंस रामकृष्ण मौनी बाबा शिक्षण संस्था द्वारा संचालित अहिल्यादेवी होळकर वसतीगृहांची तपासणी संबंधित जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आलेली आहे. सदर तपासणी दरम्यान आढळून आलेल्या त्रूटी व त्यांचा पूर्ततेबाबत सदर संस्थांना कारणे दाखवा नोटीस संबंधित जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत बजावण्यात आलेली आहे.

चिखली येथील परमहंस रामकृष्ण मौनीबाबा शिक्षण संस्थेने अहिल्यादेवी होळकर नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतीगृह सुरु ठेवणे शक्य नसल्याने, सदर वसतीगृह बंद करण्याची परवानगी मिळणेबाबत सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

मौजे मांढळ (ता. कुही, जि.नागपूर) या सोनपुरी गावातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

(४०) ५२१० (२४-०४-२०२५). श्री.संजय मेश्राम (उमरेड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मांढळ (ता. कुही, जि.नागपूर) येथील नागपूर - आंभोरा मुख्य रस्त्यावरील खैरलांजीपासून २ कि.मी अंतरावर असलेल्या सोनपुरी गावातील रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावात जाण्यास रस्ता चांगला नसल्याने स्थानिक नागरिकांना, शालेय विद्यार्थ्यांना सायकल किंवा पायी असा खडतर प्रवास करावा लागतो तसेच रस्त्याच्या दुरुस्तीबाबत स्थानिक नागरिकांनी संबंधित विभागाला वारंवार तक्रार करुनही शासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदरील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करणेबाबत व गावातील स्थानिक नागरिक, विद्यार्थी यांची होणारी गैरसोय दूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१६-०९-२०२५) : (१), (२) व (३) रस्ते विकास आराखडा सन २००१-२०२१ नुसार सोनपूरी ते खैरलांजी रस्ता ग्रामीण मार्ग क्र.१८९ दर्जाचा असून सदर रस्त्याची एकूण लांबी २.०० कि.मी. इतकी आहे. सदर रस्त्याच्या सा.क्र.०/०० ते ०/५०० मधील लांबी खडीकरणाची आहे. उर्वरित लांबी डांबरी पृष्ठभागाची असून नादुरुस्त आहे. यास्तव सदर रस्त्याचे काम रस्ते व पूल दुरुस्तीच्या विविध योजनेतून प्राप्त होणाऱ्या निधीमधून घेण्याच्या सूचना जिल्हा परिषदेस देण्यात आलेल्या आहेत.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये लेखाशिर्ष २५१५-१२३८ (मा.लोकप्रतिनिधींना सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे) अंतर्गत सोनपूरी गावातील रु.८.०० लक्ष रकमेच्या रस्त्याच्या कामास मंजूरी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

गंगाखेड, पालम (ता.पूर्णा, जि.परभणी) या गावांमध्ये स्मशानभूमीस शेडची व्यवस्था नसल्याबाबत

(४१) ५३६४ (२४-०४-२०२५). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गंगाखेड, पालम (ता.पूर्णा, जि.परभणी) या गावांमध्ये स्मशानभूमीस शेडची व्यवस्था नसल्याने पावसाळ्यात अत्यंविधीसाठी येणाऱ्या नागरीकांचीही मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील गावांना स्मशानभूमीस शेड बांधण्यास निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन मुख्यमंत्री यांचेकडे माहे सप्टेंबर,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर तालुक्यातील गावांना स्मशानभूमीस शेड बांधण्यास निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (०९-०९-२०२५) : (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यात एकूण ८४, पूर्णा तालुक्यात एकूण ७९ व पालम तालुक्यात एकूण ६६ ग्रामपंचायती असून त्यापैकी अनुक्रमे ५३, ५० व ३३ गावात किमान एक स्मशानशेड उपलब्ध आहे.

सन २०२३-२४ व सन २०२४-२५ मध्ये वरील ३ तालुक्यांत अनुक्रमे २७, ३४ व ३५ इतक्या स्मशानभूमी शेड जिल्हा नियोजन समिती, जिल्हा परिषद स्तर १५ वा वित्त आयोग इ. योजनांमधून मंजूर करण्यात आल्या आहेत. तसेच, सन २०२५-२६ मध्ये वरील ३ तालुक्यांत अनुक्रमे ८,१० व ११ इतक्या स्मशानभूमी शेड प्रस्तावित आहे.

तसेच, ज्या गावांमध्ये स्मशानभुमीसाठी जागा उपलब्ध नाही, अशा ठिकाणी सरकारी गायरान, सरकारी जागा किंवा खाजगी जागा दानपत्र अथवा भुसंपादन याद्वारे त्यासंबंधी प्रस्ताव सादर करण्याबाबत संबंधित गट विकास अधिकारी यांना कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

बीड येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास मंजुरी मिळणेबाबत

(४२) ५४४१ (२८-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील नागरिक व शेतकरी हे कोरडवाहू शेती व शेती मजुरीवरच आपली उपजिविका भागवत असून हा जिल्हा ऊसतोड कामगाराचा तसेच मागासलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीड जिल्हा रुग्णालयात उपलब्ध नसलेल्या शस्त्रक्रियेसाठी नागरिकांना खाजगी रुग्णालयात किंवा छत्रपती संभाजीनगर किंवा पुणे येथे उपचाराकरीता जावे लागत असून ते त्यांच्या आर्थिक परिस्थितीला परवडणारे नसते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक नागरिकांची मागणी व अडचण लक्षात घेता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी बीड येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला मंजुरीसाठी तत्कालीन मा. मुख्यमंत्री, विद्यमान मा. मुख्यमंत्री, मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री तसेच प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण यांच्याकडे रीतसर पत्राद्वारे दिनांक १८ जून, २०२४ व दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हाधिकारी, बीड यांच्या अधिनस्त असलेल्या शासकीय जमिनीपैकी बीड शहरालगत असलेली गट नं. ४० येथे शासकीय जमीनदेखिल महाविद्यालयासाठी उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बीड येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास मंजुरी मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१६-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यात अंबाजोगाई येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयाची स्थापना यापूर्वीच करण्यात आली आहे. सदर वैद्यकीय महाविद्यालयाची पदवी व पदव्युतर अभ्यासक्रमाची एकूण विद्यार्थी प्रवेश क्षमता २४४ आहे. तसेच ५१८ रुग्णखाटांचे रुग्णालय सद्यस्थितीत कार्यरत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील लोकरवाडी-माळेगाव रस्त्यासह तालुक्याला जोडणारे रस्ते निकृष्ट असल्याबाबत

(४३) ५४५५ (२४-०४-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयातील तालुका आर्णी येथील लोकरवाडी-माळेगाव रस्त्यासह तालुक्याला जोडणाऱ्या सावळी सदोबा या ग्रामीण भागातील बहुतांश रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याने रस्त्यावर खड्डे पडल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्यांच्या कामाच्या गुणवत्तेकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष तसेच संबंधित ठेकेदार यांच्या मनमानी कारभारामुळे शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर तसेच रस्त्याच्या कामाची गुणवत्ता तपासणीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१६-०९-२०२५) : (१), (२) व (३) सावळी सादोबा या ग्रामीण भागातील माळहिवरा-लोनबेहळ-शेलु-अंजनखेड-अचोरा-माळेगाव-सावळी रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.१४२ दर्जाचा असून सदर रस्त्याची एकूण लांबी ३१.९० कि.मी. इतकी आहे. सदर रस्त्याच्या सा.क्र.२८/५०० ते ३१/०० या लांबीचे रु.४२.०० लक्ष रकमेचे काम सन २०२१-२२, रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम (लेखाशिर्ष ३०५४-२४१९) अंतर्गत पूर्ण करण्यात आलेले असुन सुस्थितीत आहे.

सन २०२३-२४, लेखाशिर्ष ५०५४-४३४४ मार्ग व पूल अंतर्गत सदर रस्त्याच्या सा.क्र.३१/०० ते ३१/९०० मधील लांबीचे काँक्रीटीकरणाचे रु.५०.०० लक्षचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

सदर रस्त्याच्या सा.क्र.२६/०० ते ३०/०० मधील लांबीच्या दुरुस्तीचे रु.२५०.०० लक्षचे काम माहे डिसेंबर, २०२३ च्या अर्थसंकल्पामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मंजूर असून प्रगतीत आहे.

या व्यतिरिक्त सावळी सादोबा ग्रामीण भागातील माळेगांव दातोडी रस्ता (ग्रामा-१२९), दातोडी झापरवाडी उमरी रस्ता (इजिमा-१३९) व प्रजिमा-९० ला जोडणारा वरुड पोच रस्ता (ग्रामा-१४४) या रस्त्यांची रु.७००.०० लक्ष इतक्या रक्कमेची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रगतीत आहेत. सदरची कामे पूर्ण झाल्यानंतर नियमानुसार सदर कामांना दोषदायित्व कालावधी (Defect Liability Period) लागू असणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील राज्य विमा योजनेंअतर्गत कामगारांना मिळणाऱ्या सुविधांबाबत शिबीर भरविणे सह कामगारांची थकीत देयके मंजूर करण्यासाठी अनुदान देणेबाबत

(४४) ५४९७ (३०-०४-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे विभागातील ९० हजारावर उद्योग आस्थापनांमध्ये सुमारे १५ लाख कर्मचारी आणि कामगार राज्य कामगार विमा योजनेचे लाभ घेत असून कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांना नोंदणी विमा क्रमांकद्वारे आजारपणातील लाभ, अपंगत्वाचे लाभ अवलंबित्वाचे लाभ, मातृत्व लाभ, वैद्यकीय लाभ, विमाकृत महिला किंवा विमाकृत व्यक्तीच्या पत्नीला प्रसुती खर्च तसेच विमाकृत व्यक्तीच्या अंत्यसंस्कारच्या वेळी झालेल्या खर्चापोटी अन्त्येष्टी खर्च, व्यवसायिक आणि शारीरिक पुनर्वसन, बेरोजगारी भत्ता, कौशल्य अन्नयन प्रशिक्षण आदी सुविधांचा लाभ देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे विभागातील आस्थापनात १० पेक्षा जास्त कामगार कार्यरत असलेल्या २१ हजारापर्यंत वेतन घेणारे पात्र कामगार हे सामाजिक सुरक्षा कवचाअंतर्गत राज्य विमाचे लाभार्थी असतात परंतू येथील मोठ्या कंपन्यातील कामगारा व्यतिरिक्त लघुउद्योग, दुकाने, हॉटेल रेस्टॉरंट ,सिनेमाघर आदी ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ही सुविधा मिळत नसल्याचे निदर्शनास आले असून पुणे विभागातील काही कंपन्या व लघुउद्योजक कामगार आणि कर्मचाऱ्यांसाठी कामगार राज्य विमा योजनेचे (ईएसआय) कार्ड काढणेबाबत टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,कामगार विभागाअंतर्गत नोंदणी असलेल्या उद्योग व विविध आस्थापनांचे मालक यांनी ईएसआय योजनेसाठी कामगारांच्या देय वेतनाच्या ३.२५ टक्के रक्कम तर कामगारांनी ०.७५ टक्के रक्कम योगदान देणे गरजेचे असते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ईएसआय रुग्णालय अथवा ईएसआय ने मान्यता दिलेल्या डॉक्टरांकडे नोंदणी झाल्यावरच लाभार्थ्यांना ईएसआय रुग्णालय, दवाखाने आदीमध्ये वैद्यकीय सुविधा व उपचार दिले असून पुणे जिल्ह्यातील पात्र कामगार ईएसआय रुग्णालय वगळता खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्याने त्याची प्रतिपूर्ती रक्कम मिळावी म्हणून ईएसआय कार्यालयाकडे दावे करीत असून जिल्ह्यातील कामगारांची सुमारे साडे पाच कोटी रुपयांची मंजूर देयके राज्य अनुदाना अभावी राज्य कामगार विमा सोसायटी, मुंबई यांच्याकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार ईएसआय रूग्णालयामार्फत लघुउद्योग कंपन्यांना संपर्क साधून या योजनेअंतर्गत कामगारांना मिळणाऱ्या सुविधांबाबत शिबीर भरवणे तसेच कामगारांची थकीत देयके मंजूर करण्याठी अनुदान देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर (०७-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे. राकावि महामंडळामार्फत नोंदणीकृत विमा कामगारांना वैद्यकिय हितलाभ (Medical benefit), रुग्णता हितलाभ (Sickness Benefit), अवलंबित हितलाभ (Dependent Benefit), प्रसूती हितलाभ (Maternity Benefit), तात्पुरते अपंगत्व हितलाभ (Temporary Disablement Benefit), कायम अपंगत्व हितलाभ (Permanent Disablement Benefit), अंत्यसंस्कारासाठी सहाय्य (Funeral Assistance) इ. लाभ देण्यात येतात.
(२) हे खरे नाही. राकावि महामंडळ (ESIC) सातत्याने कंपन्या व कामगार यांना राकावि महामंडळ जनजागृती उपक्रम उदा. सुविधा समागम अन्वये कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काबद्दल माहिती देण्याचा प्रयत्न करत असते. तसेच ज्यावेळी राकावि धोरणांचे संबंधितांकडुन पालन होत नाही, त्या त्या वेळी राकावि महामंडळाकडून आवश्यक ती कार्यवाही केली जाते, असे राकावि महामंडळाने दि.०४.०३.२०२५ च्या पत्रान्वये कळविले आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) हे खरे नाही.

आपात्कालीन परिस्थितीत परस्पर खाजगी रूग्णालयांत विमा लाभार्थ्यांने वैद्यकीय उपचार घेतल्यास त्याची वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती वेळीच करण्यात येते. महा-राकावि सोसायटी स्थापित झाल्यानंतर विमारूग्णांवर होणारा खर्च हा १००% राकावि महामंडळाकडून करण्यात येतो. त्यानुषंगाने राकावि महामंडळ मुख्यालय, नवी दिल्ली यांचेकडून दि.२०.०२.२०२५ रोजी निधी प्राप्त झाला असून, विमाधारकांच्या वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीसाठी राकावियो रूग्णालय, पुणे यांना दि.२०.०२.२०२५ रोजी रू.१.५० कोटी रूपये व वैद्यकीय प्रशासन अधिकारी कार्यालय, पुणे यांना दि.२७.०२.२०२५ रोजी रू.५.९९ कोटी इतक्या अनुदान वाटप करण्यात आलेले आहे.

ईएसआय सेवा दवाखाने अथवा ईएसआयच्या विमा वैद्यकीय व्यवसायी पॅनलवर कार्यरत खाजगी डॉक्टरांकडे (विमा वैद्यकीय व्यवसायिक-IMP) विमाधारकांची वैद्यकीय उपचारासाठी नोंदणी झाल्यावर विमा लाभार्थ्यांना ईएसआय रूग्णालये, सेवा दवाखाने, विमा वैद्यकीय व्यवसायिक आदींकडे वैद्यकीय सुविधा व उपचार दिले जातात. शासनाने घोषित केलेल्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाअंतर्गत राकावि रुग्णालया मार्फत पुणे जिल्ह्यात १२७ शिबिरे घेण्यात आलेली आलेली आहेत.
(६) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

चिकलठाणा (जि.छत्रपती संभाजीनगर) यथील राज्य विमा कामगार रुग्णालयात आयसीयू वॉर्ड कार्यान्वित करणेबाबत

(४५) ५८६३ (०५-०५-२०२५). श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिकलठाणा (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील एमआयडीसी क्षेत्रातील राज्य विमा कामगारांच्या रुग्णालयात सन २०२१-२२ या वर्षात दहा बेडचे आयसीयू वॉर्ड तयार केले तथापि ते अजमितीस कार्यान्वित झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे रु.३८ कोटी इतकी रक्कम खर्चून उभारण्यात आलेले जिल्हा रुग्णालय सन २०१८ मध्ये अघोषितरित्या कार्यान्वित करण्यात आले असून सहा वर्षांतच या इमारतीच्या डागडुजीकरिता दीड कोटी रुपये खर्च करण्यात येणार असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर (१०-११-२०२५) : (१) हे,अंशत: खरे आहे.

राकावियो रुग्णालय छत्रपती संभाजीनगर च्या आयसीयूचे काम ऑगस्ट २०२४ मध्ये पूर्ण झाल्यानंतर Fire Compliance व Testing चे काम पुर्ण करण्यात येऊन दिनांक २२.०३.२०२५ रोजी Fire NOC प्राप्त करुन घेण्यात आली. त्यानंतर आयसीयू करीता आवश्यक डॉक्टर्स,नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची कंत्राटी स्वरुपात नियुक्ती करण्यात येऊन सदर आयसीयू दिनांक १५.०८.२०२५ पासून सुरु करण्यात आले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) छत्रपती संभाजीनगर येथे सा.बां.विभागामार्फत २०० बेडचे नवीन जिल्हा रुग्णालय सन २०१५ मध्ये पूर्ण करण्यात येऊन जिल्हा कार्यालयास सन २०१७ मध्ये हस्तांतरीत करण्यात आले आहे. सदरील जिल्हा रुग्णालयात रुग्णालयीन सेवा देण्याकरिता इमारतीमध्ये किरकोळ कामांची आवश्यकता असल्याने, जिल्हा रुग्णालयाच्या मागणीप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रत्यक्ष पाहणी करुन किरकोळ कामे प्रस्तावित केलेली आहेत. सदर प्रस्तावातील रु.१५०.१५ लक्ष इतक्या रक्कमेच्या कामास दि.१२.११.२०२४ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असुन सदर काम कार्यरंभ आदेशस्तरावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील प्रशासनामध्ये अनेक पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आल्याबाबत

(४६) ५८७६ (०५-०५-२०२५). श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सरकारी नोकरभरतीवर मर्यादा असल्याने राज्यातील प्रशासनामध्ये अभियंत्यापासून शिपायांपर्यंत सुमारे १५० पदे कंत्राटी पध्दतीने भरली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंत्राटी कर्मचाऱ्यांना एजन्सी कमी पगार देत असल्याने हे कर्मचारी गैरमार्गाने पैसे काढण्याचा प्रयत्न करतात तसेच कायदेशीर कारवाई होत नसल्याने हे गैरप्रकार वाढत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर (०१-०८-२०२५) : (१) प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेवून विकासाच्या कामासाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याचे दृष्टीने शक्य असेल तिथे बाह्ययंत्रणेमार्फत कामे करून घेण्याबाबत वित्त विभागाने दि.२७.४.२०२२ च्या शासन निणर्यान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन, राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभाग/कार्यालयांनी वेळोवेळी बाह्य यंत्रणेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध करून घेतले आहे.
(२) व (३) कंत्राटी कामगार करत असलेली कामे त्या विभागास आवश्यक व बारमाही स्वरुपाची असली तरी त्यांना किमान वेतन देखील मिळत नसल्याच्या तक्रारी कामगार विभागाकडे प्राप्त होतात. सदर तक्रारींची दखल घेऊन क्षेत्रीय कार्यालयांमार्फत उभयपक्षांच्या बैठका आयोजित करुन किमान वेतन मिळवून देण्याची कार्यवाही केली जाते. तथापि, काही मुख्य मालक/कंत्राटदारांकडून उचित प्रतिसाद प्राप्त न झाल्यास किमान वेतन

अधिनियम, १९४८ च्या कलम २० अंतर्गत सहायक कामगार आयुक्त यांच्यासमोर दावे दाखल करुन किमान वेतन मिळवून देण्याची कार्यवाही केली जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात कर्करोग तपासणी मोबाईल व्हॅन द्वारे करणेबाबत

(४७) ५९४९ (०५-०५-२०२५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कर्करोगाला रोखण्यासाठी शहरासह गावा-गावात आठ कर्करोग मोबाईल व्हॅनद्वारे निशु:ल्क तपासणी करण्याबाबतचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोबाईल व्हॅनद्वारे मुख कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशयाच्या कर्करोग या तीनच प्रकारच्या कर्करोगाची तपासणी होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या ८ मोबाईल व्हॅनद्वारे कर्करोगाचे तपासणी करण्याचे नियोजन कशाप्रकारे होणार आहे तसेच स्कॅनींग मध्ये कर्करोग संशयित रुग्ण आढळल्यास या
रुग्णांचे पुढील निदान व उपचार कशा प्रकारे केले जाणार आहेत तसेच हे उपचार गरजू रुग्णांना मोफत मिळणार आहेत काय ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर (१३-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे .
(२) होय, हे खरे आहे .
(३) ग्रामीण भागांमध्ये कर्करोगाचे शिबीरांच्या मार्फत तीन प्रकारच्या कर्करोगाच्या बाबत स्तन कर्करोग, गर्भाशयमुख कर्करोग आणि मुख कर्करोग तपासणी, जनजागृती आणि निदान करण्यासाठी ०८ परीमंडळामार्फत जिल्हयांमध्ये कॅन्सर डायग्नोस्टीक व्हॅनची सुविधा सुरु करण्यात आली आहे.

सदर वाहने वर्षाभरात संबंधीत परिमंडळांतर्गत येणाऱ्या सर्व संबंधित जिल्हयात समान कालावधीत आरोग्य सेवा देतील.

राज्यात सध्या ०८ मोबाईल कॅन्सर डायग्नोस्टीक व्हॅनच्या माध्यमातून कर्करोग प्रतिबंधात्मक तपासणी (Preventive Oncology), कर्करोग निदान-बायोप्सी आणि हिस्टोपॅथॉलॉजी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. निदान झालेल्या रुग्णांना शासकीय रुग्णालयात संदर्भित करण्यात येतात. या शिवाय प्रधानमंत्री जनआरोग्य योजना/महात्मा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत संलग्न रुग्णालयांमध्येही अशा रुग्णांना उपचार घेण्याची सोय आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नागपूर जिल्हा परिषद महिला बचत गटासाठी कमर्शिअल शॉपिंग मॉल उभारण्याबाबत

(४८) ५९५० (२४-०४-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हा परिषदेच्या मालकीच्या वडकस चौकातील जागेवर महिला बचत गटासाठी कमर्शिअल शॉपिंग मॉल उभारण्याचा सुमारे १०० कोटी रुपयांचा प्रस्ताव जिल्हा परिषद, नागपूरने राज्य शासनाकडे सादर

केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे;
(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाच्या मंजूरीस आणि उभारणीच्या कामास किती कालावधी अपेक्षित आहे;
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१०-०९-२०२५) : (१) होय, अशंत: खरे आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नागपूर यांच्या दि.१७.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये नागपूर जिल्हा परिषदेच्या मालकीच्या वडकस चौकात महिला बचत गटासाठी कमर्शिअल शॉपिंग मॉल उभारण्याचा रु.२५.०० कोटीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता.
(२) ग्रामीण भागातील महिला बचत गटातील उद्योग करणाऱ्या सर्व महिलांना हक्काची बाजारपेठ मिळावी, त्यांना उत्पादने ३६५ दिवस विक्री करता यावी यासाठी मॉलच्या माध्यमातून त्यांना हक्काचे दालन उपलब्ध करुन देणे.
(३) कमर्शिअल शॉपिंग मॉल बांधकामासारख्या घटकासाठीची योजना सद्यस्थितीत अस्तित्वात नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हा परिषद चंद्रपूर अंतर्गत आदिवासी प्राथमिक शिक्षकांना सेवाज्येष्ठतेचे सर्व लाभ मिळणेबाबत

(४९) ६११८ (२४-०४-२०२५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असलेल्या आदिवासी प्राथमिक शिक्षकांना त्यांच्या नियुक्ती दिनांकापासून सेवाज्येष्ठतेचे सर्व लाभ देण्याबाबत शासनाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सेवाजेष्ठतेचा हक्क नियुक्ती दिनांकापासून ग्राह्य धरण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सेवाज्येष्ठतेचा हक्क नियुक्ती दिनांकापासून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (०९-०९-२०२५) : (१) (२) (३) सेवा ज्येष्ठतेबाबत प्रचलित शासन धोरणानुसार प्राथमिक शाळेमधील शिक्षकाची सेवाज्येष्ठता त्याने या पदासाठी विहीत करण्यात आलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून ग्राह्य धरणे आवश्यक आहे. त्यामुळे नियुक्तीच्या वेळी संबंधित शिक्षकाने आवश्यक अर्हता धारण केली असल्यास त्याची सेवाज्येष्ठता सेवेत रुजु होण्याच्या दिनांकास निश्चित करुन पात्र शिक्षकांना आवश्यक ते लाभ जिल्हा परिषद, चंद्रपूर मार्फत देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर येथील वैद्यकीय महाविद्यालयामधील बंद असलेले सिटीस्कॅन व एक्स-रे मशीन दुरुस्ती करणेबाबत

(५०) ६५४६ (०५-०५-२०२५). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील वैद्यकीय महाविद्यालयामध्ये (मेडिकल कॉलेज) सिटीस्कॅन व एक्स-रे मशीन बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सिटीस्कॅन व एक्स-रे मशीन दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१७-०९-२०२५) : (१), (२) व (३) दिनांक ०८.०१.२०२५ ते ११.०१.२०२५ पर्यंत सी.टी. स्कॅन मशीन बंद होती हे खरे आहे,

तथापि दिनांक १३.०१.२०२५ रोजी सदर यंत्र दुरुस्ती करुन चालू करण्यात आले असून रुग्ण सेवा सुरळीत करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

जितेंद्र भोळे
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.